शुक्रवार, 15 जुलै 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 01 ⊙ अंक - 309
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 15 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-309 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

# विदर्भासह ७५ वेगळी राज्ये करा

## काँग्रेसचे पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र?

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर : राज्यात एकीकडे सत्ता संघर्षाच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापलेले दिसत आहे. यातच राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली असून, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवही देशभरात सुरू आहे. मात्र, देशाची लोकसंख्या प्रचंड वाढली असून, राज्यांचे नियोजन अधिक योग्य पद्धतीने व्हावे, यासाठी देशात देशात विदर्भासह ७५ वेगळी राज्य करा, अशा आशयाचे पत्र काँग्रेसकडून आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देण्यात येणार आहे. तसेच स्वतंत्र विदर्भाची मागणी अधिक तीव्र करण्यासाठी रणनीतिकार प्रशांत किशोर सक्रीय होणार असल्याचे सांगितले जात आहे.**

महाराष्ट्रातील काँग्रेस नेते आशिष देशमुख यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली. देश अमृत महोत्सवी वर्ष साजरे करतोय, पण वाढत्या लोकसंख्येची गणितं कशी जुळवणार? त्यासाठी राज्यांचीदेखील संख्या वाढवली पाहिजे. अमेरिका, स्विझर्लंडसारख्या देशांमध्ये लोकसंख्येनुसार राज्यांची रचना करण्यात आली आहे. त्यामुळेच तेथील राज्ये प्रगत आहेत. भारतात राज्यांची संख्या लोकसंख्येच्या गणितानुसार वाढवल्यास प्रत्येक राज्यावर जास्त लक्ष केंद्रित करून विकास करता येईल. आता संपूर्ण देशाची विभागणीच २९ ऐवजी ७५ राज्यांमध्ये करावी, असे आशिष देशमुख यांनी म्हटले आहे. यासाठी ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्रही लिहिणार आहेत.

**प्रशांत किशोर यांनीही केली कामाला सुरुवात !**

स्वतंत्र विदर्भाची मागणी अनेक वर्षांपासून लावून धरण्यात आली आहे. मागणी अधिक तीव्र करण्यासाठी ज्येष्ठ




रणनीतिकार प्रशांत किशोर यांनी विनंतीला मान देऊन यासाठी काम सुरु केले आहे, अशी माहिती आशिष देशमुख यांनी दिली. स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाली. लोकसंख्या वाढली आहे. १३० कोटी जनतेचा देश आणि २९च राज्य आहेत. म्हणून ७५ राज्य करावीत, अशी मागणी करतो. महाराष्ट्र १९६० मध्ये स्थापन झाला. तेव्हा ३ कोटी लोकसंख्या होती. आता तीच लोकसंख्या १३ कोटींवर पोहोचली आहे. राज्य चांगली चालवायची असतील तर त्यांचे विभाजन होणे गरजेचे आहे. राज्यांचे सरकार लोकांसाठी प्रभावीपणे काम करणे अपेक्षित असेल तर आपल्या देशातील राज्य वाढली पाहिजेत. या सर्व मागण्यांसाठी पंतप्रधान मोदी यांना पत्र लिहिणार असल्याचे आशिष देशमुख यांनी सांगितले.

### प्रशांत किशोर यांचे अभ्यासपूर्ण योगदान

दरम्यान, रणनीतिकार प्रशांत किशोर यांनी कित्येक राज्यांचा अभ्यास केला आहे. पंतप्रधान मोदी, ममता बॅनर्जी, जगनमोहन रेड्डी, तेलंगणाचे केसीआर, नितीश कुमार या सर्व लोकांच्या विजयात अत्यंत अभ्यासपूर्ण योगदान दिले आहे. आता ते स्वतंत्र विदर्भ राज्याच्या चळवळीत उतरण्यासाठी तयार झाले आहेत. आता त्यांच्या मदतीने स्वतंत्र विदर्भाची चळवळ आम्ही अधिक प्रभावीपणे राबवण्याचे ठरवले आहे. या चळवळीच्या माध्यमातून केंद्र सरकार आणि भाजपला देशातील ३०वे राज्य लवकरच स्थापन करण्यासाठी बाध्य करू, असे आशिष देशमुख म्हणाले.

## महत्त्वाची बातमी

### नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या निवडणुका स्थगित




आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेत राज्यातील ९२ नगरपरिषदा आणि ४ नगरपंचायतींमधील सदस्यपदांच्या सार्वत्रिक निवडणुका स्थगित केल्या आहेत. स्थगित करण्यात आलेल्या निवडणुकांसाठी सुधारित कार्यक्रम यथावकाश जाहीर करण्यात येईल, असे राज्य निवडणूक आयोगाने कळवले आहे. या निर्णयानंतर निवडणूक जाहीर करण्यात आलेल्या क्षेत्रांत लागू करण्यात आलेली आचारसंहिता लागू राहणार नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. ओबीसींच्या राजकीय आरक्षणासंबंधी सुप्रिम कोर्टात सुनावणी सुरू आहे. त्यासाठी आता १९ जुलै ही तारीख देण्यात आली आहे. तोपर्यंत नव्या निवडणुका जाहीर करू नयेत, असे कोर्टाने म्हटले होते. त्यानंतर आयोगाने हा निर्णय घेतला आहे. राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ८ जुलै रोजीच्या पत्राद्वारे राज्यातील एकूण १७ जिल्ह्यांमधील ९ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या सदस्यपदांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. मात्र, सर्वोच्च न्यायालयात १ जुलै रोजी विशेष अनुमती याचिकेवरील सुनावणी झाली.

## चर्चेतली बातमी

### हा नवीन भारताचा नवीन शब्दकोष आहे : राहुल गांधी



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पावसाळी अधिवेशनापूर्वी लोकसभा आणि राज्यसभेत बोलताना अनेक शब्दांवर बंदी घालण्यात आली. त्यावरून आता राजकारण सुरू झाले आहे. यावरूनच राहुल गांधी यांनी ट्वीट करत केंद्र सरकारवर टीका केली आहे.

केंद्र सरकारच्या या निर्णयावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी ट्वीट करत मोदी सरकारवर टीका केली आहे. हा नवीन भारताचा नवीन शब्दकोष आहे, असा टोला राहुल गांधी यांनी लगावला आहे. सरकारच्या कामकाजाचे योग्य वर्णन करणाऱ्या शब्दांवर सरकारकडून बंदी घालण्यात आली आहे, असेही ते म्हणाले. जुमलाजीवी, हुकूमशहा, शकुनी, जयचंद, विनाश पुरुष, रक्ताची शेती वगैरे शब्द हे असंसदीय आहे. असे केंद्र सरकारकडून जाहीर करण्यात आले आहे. या शब्दांची एक लांबलचक यादी तयार करण्यात आली आहे. संसदेच कामकाज किंवा चर्चेदरम्यान हे शब्द वापरता येणार नाही, असे संसेच्या सचिवालयाकडून सांगण्यात आले आहे.

# राज्यात पेट्रोल प्रतिलिटर ५ तर डिझेल ३ रुपयांनी स्वस्त

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. पेट्रोलचा दर पाच रुपयांनी तर डिझेलचा दर तीन रुपयांपर्यंत कमी करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. राज्य मंत्रीमंडळाची आज बैठक घेण्यात आली. या बैठकीत वेगवेगळी विकासकामे तसेच योजनांच्या अंमलबजावणीवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वरील घोषणा केली.

केंद्र सरकारने ४ नोव्हेंबर २०२१ व २२ मे २०२२ रोजी पेट्रोल- डिझेलच्या दरात कपात केली होती. त्यांनी राज्य शासनालादेखील कर कमी करण्याचे आवाहन केले होते. काही राज्यांनी केंद्राच्या सूचना मान्य करुन इंधनाचे दर कमी केले होते. मात्र आपल्या राज्यात इंधनाचे दर कमी करण्यात आले नव्हते. आपल्या युतीच्या सरकारने ठरवले आहे, की राज्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन जनतेच्या हिताचे निर्णय घेतले पाहिजेत. त्यामुळे आजपासून पेट्रोलचे पाच रुपये तर डिझेलचे दर तीन रुपयांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे राज्य सरकारवर सहा हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडणार आहे, असे एकनाथ शिंदे यांनी दरकपातीचा निर्णय जाहीर करताना सांगितले.



**याआधी दिले होते संकेत**

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्याच दिवशी इंधन दरकपात करण्याचे संकेत दिले होते. येणाऱ्या काळात लवकरच पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी करु, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले होते. त्यानुसार आज ही इंधन दरकपातीची घोषणा करण्यात आली.

**काही दिवसांपासून सातत्याने इंधन दरवाढ**

रशिया-युक्रेन युद्धामुळे समस्त जगाला इंधन दरवाढीला सामोरे जावे लागले. भारतातही त्याची झळ बसली असून मागील काही दिवसांपासून पेट्रोल आणि डिझेलचे दर सातत्याने वाढत आहेत. काही दिवसांपूर्वी केंद्र सरकारने इंधनावरील करपात केली होती. तसेच राज्यांनादेखील कर कमी करण्याचे आवाहन केले होते. मात्र महाविकास आघाडी सरकारने इंधनाचे दर कमी केले नव्हते. त्यानंतर आता सत्ताबदल झाल्यामुळे राज्य सरकारने पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी करण्याचा निर्णय घेतला.



# भरतीच्या वेळी धडकल्या मोठ्या लाटा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात सर्वदूर पावसाचा जोर चांगलाच वाढला आहे. त्यातच आज बुधवार दि. १४ जुलै रोजी मुंबईतील 'गेटवे ऑफ इंडिया' येथे भरतीच्या वेळी मोठ मोठ्या लाटा धडकताना दिसल्या. या लाटांचा आनंद घेण्यासाठी मुंबईकरांनी मुंबई येथील ताज हॉटेलजवळ एकच गर्दी केली.

सतत होत असलेल्या अतिवृष्टीमुळे मुंबई विद्यापीठाने आज गुरुवार दि. १४ जुलै रोजीच्या सर्व परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या परीक्षेची नवीन तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमा पन मंडळाचे संचालक डॉ. विनोद पाटील यांनी सांगितले. आज मुख्यतः इंजिनिअरिंग विद्याशाखेच्या परीक्षा होत्या. त्याचबरोबर इतरही विद्याशाखेच्या परीक्षाही रद्द करण्यात आल्या आहेत.

भविष्यातील पाण्याचे नियोजन करण्याच्या दृष्टीने २७ जूनपासूनच महापालिकेने १० टक्के पाणी कपातीस सुरवातही केली होती. राज्यभर पावसाचा लहरीपणा सुरु असला तर मुंबईमध्ये मात्र संततधार सुरु होती. १ जुलैपासून तर यामध्ये भरच पडली.


# अतिवृष्टीमुळे पाचवी आणि आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा पुढे ढकलली

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राज्य परीक्षा परिषदेतर्फे २० जुलैला होणारी पाचवी आणि आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. मात्र राज्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे ही परीक्षा आता ३१ जुलैला घेण्याचा निर्णय घेण्यात येणार असून, २० जुलैच्या परीक्षेसाठीचे प्रवेशपत्रच ३१ जुलैच्या परीक्षेसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

परीक्षा परिषदेच्या आयुक्त शैलजा दराडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. २० जुलैला राज्यभरातील केंद्रांवर एकाचवेळी परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र राज्यातील अनेक जिल्ह्यांत होत असलेल्या अतिवृष्टीमुळे उद्भवलेली पूरसदृश्य स्थिती आणि बहुतांश ठिकाणी भूस्खलनामुळे वाहतूक बंद असल्याने परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना अडचणी येऊ शकतात. तसेच विद्यार्थीहित आणि त्यांची सुरक्षा लक्षात घेऊन परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे आता परीक्षा ३१ जुलैला घेण्यात येईल.

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
● सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
● पासबुक व पावतीची सोय
● लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
● सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# अवलियांचा गाव : राहाता

आधुनिक केसरी

' जगात दोन प्रकारचे लोक असतात. पहिल्या प्रकारचे लोक वृक्ष लावतात. दुसऱ्या प्रकारचे लोक वृक्ष तोडतात. जेव्हा या गावाच्या पर्यावरण प्रेमाचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा या गावातल्या लोकांचं नाव वृक्ष लावणाऱ्यांच्या यादीत असेल. ढासळते पर्यावरण पाहून उद्याची पिढी आपल्याला जाब विचारणार आहे की तुम्ही आमच्यासाठी काय केले ? कोणता वारसा मागे ठेवला ? या प्रश्नाचे उत्तर राहाता वासियांनी आपल्या कृतीतून दिले आहे. या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन दशरथ तुपे या तरुणानं केलं. वरवर कमी शिकलेला वाटणारा, बोलीभाषेतून बोलणारा हा तरुण पाहिला. त्याच्या बोलण्यात शहरातील माणसांच्या बोलण्यातील सफाईदारपणा नव्हता. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर बोलणं ' पॉलिश्ड ' नव्हतं. पण शिकलेल्यांची ' पॉलीश ' फिकी पडेल अशी उत्स्फूर्तता, अकृत्रिम जिव्हाळा आणि उत्साह त्याच्या बोलण्यातून उतू जात होता.
' पिंजरा ' चित्रपटात एक गाणं आहे. हे गाव लई न्यारं, हित थंडगार वारं ....' मला हे गाणं आठवलं पण वेगळ्या अर्थानं आणि म्हणावसं वाटलं

हे गाव लई न्यारं
हित
समरसतेचं वारं
याला भेदभाव बिलकुल सोसंना
सारे जमती, झाडं लावती
वृक्ष कुणीही तोडंना

तर असं हे गाव. इथं कार्यक्रम संपल्यानंतर एक राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक भेटले. त्यांनी त्यांचे विविध सामाजिक आणि विद्यार्थी हिताचे अनेक उपक्रम सांगितले पण वेळेअभावी त्यांच्याशी फार बोलता आलं नाही. आरोग्य विभागात काम करणारे राजेंद्र फंड भेटले. त्यांचाही अनेक सामाजिक उपक्रमात सहभाग असतो. ते लेखक, कवी आहेत. इतिहासाचे अभ्यासक आहेत. दरवर्षी एक दिवाळी अंक प्रकाशित करतात. त्यांनी अगत्याने आम्हाला त्यांच्या घरी नेले. मागील वर्षीचा एक दिवाळी अंक भेट म्हणून दिला. यानंतर साईबाबांच्या दर्शनासाठी आम्ही शिर्डी येथे गेलो. तेथे गुरुवार असल्याने दर्शनासाठी बरीच गर्दी होती पण रवींद्र सोबत असल्याने आमचे दर्शन लवकर झाले. दर्शन घेतल्यानंतर रवींद्र यांनी आमची भेट आणखी एका अवलिया व्यक्तिमत्वाशी करून दिली. त्यांचं नाव भाऊसाहेब थोरात. त्यांची तीन हॉटेल्स त्या परिसरात आहेत. थोरात हे आधी विड्याच्या पानांची विक्री करायचे. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# अनेकदा भ्रम आणि संभ्रम निर्माण होतात

आधुनिक केसरी

विचार, वर्तन आणि व्यवहार यांतील शुद्धता ही सुख आणि शांतीची जननी असते. शुद्धता हा शांती आणि आनंदाचा आधार असतो, तो पाया असतो, ती शांती आणि आनंदाची जननी असते. जिथे पवित्रता असते तिथे आपोआपच शांती आणि आनंद मिळत राहतो. आपण स्वतः कधी हे तपासून पाहतो का? किंवा आपण स्वतःच शांती आणि आनंदाचे मूर्त स्वरूप असल्याचा अनुभव घेतो का? किंवा तो तसा आपल्याला येतो अथवा तसे काही जाणवते का? कारण ह्याच्यात मूलतः फरक शुद्धतेचा असतो. आपणच आपल्या अंतर्मनात नकारात्मक अथवा अशुद्ध विचार निर्माण केले, तर शांततेऐवजी आपल्या जीवनात उलथापालथच होते.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रत्येक बाबतीत 'का?' आणि 'काय?' असे अनेक प्रश्न आहेत, कि ज्यांचा आपण सहसा, फारसा विचारच करत नाहीत आणि आपल्याला ते समजून घेण्याची, विश्लेषण करण्याची गरजच लक्षात येत नाही. 'हे घडायला नको होतं', 'हे असं व्हायला नको होतं, असं व्हायला हवं होतं, अशा अनेक प्रश्नांमुळे आपल्या अंतरंगात अनेकदा भ्रम आणि संभ्रम निर्माण होत असतात.
आपली बुद्धी सतत अनेक प्रश्न आणि शंका स्वतःलाच विचारत असते आणि स्वतःच ते प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत असते. म्हणूनच आपल्यात शांततेची, एकाग्रतेची, अक्षमतेची, आनंदाची कमतरता निर्माण होत राहते. खरा आनंद म्हणजे आपण आपल्या स्वतःच्या अंतरंगाचा, त्याच्या सहवासाचा आनंद घेणे आणि आपले शरीर, मन आणि आत्म्याशी सुसंवादाने शांती प्राप्त करण्यासाठी जगणे होय.



आधुनिक केसरी

## चंदनाची उटी | जीव झाला ||

भेगाळली धरा | पावसाची आस ||
तैसी जीवा खास | ओढ तुझी ||१||

संसारी लागेना | राऊळी रमेना ||
हुरहुरी मना | चैन नाही ||२||

अनाथ लेकरू | शोधतो निवारा ||
लटका पसारा | माया मोह ||३||

दांभिक हुंदका | कोरडा उमाळा ||
शोधतो जीव्हाळा | वेडा जीव ||४||

कंठाशी ह्या प्राण | आले विठुराया ||
तुजवीन छाया | कोण देई? ||५||

तुझ्या चरणाशी | मारता मी मिठी ||
चंदनाची उटी | जीव झाला ||६||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी

**कर्दर्थस्यापि हि धैर्यवृत्ते संभवते धैर्यगुणः प्रमार्ष्टुम् ।**
**अधोमुखस्यापि कृतस्य वहार्नेधशिखा याति कदाचिदेव।**

**अर्थ :** जसे खाली वाकवले, तरीही अग्नीच्या ज्वाला खाली जात नाहीत, त्या ऊर्ध्व दिशेसच जातात, तसेच विपन्नावस्थेतही धीरोदात्त व्यक्तीचो धैर्यगुण मिटविण्यास कोणीही सक्षम ठरत नाही. धीरोदात्त व्यक्तिमत्व आणि धैर्य यांमधील अविचलता भर्तृहरींनी या श्लोकाद्वारे स्पष्ट केली आहे. अर्थात धैर्यसंपन्न व्यक्ती कितीही संकट आले, तरी डगमगत नाहीत. अटल राहतात.


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर



## ।। दासबोध स्तवन ।।

# मायाब्रह्मनिरूपण

आधुनिक केसरी

म्हणून आत्माच अनेकपणाने दिसतो.  या ऊत्तरामध्ये द्वेत व अद्वेत सारखीच वाटतात. व दोन्ही सत्य ठरतात. परंतू एकपणा अनेकपणा परस्पर विरोधी असल्याने दोन्ही  एकाच  वस्तूच्या बाबतीत सारखे सत्य असूच शकत नाहीत.
आत्मज्ञानी पूरूषाचा प्रत्यक्ष अनुभव असा आहे की अद्वैत सत्य आहे. तो आपण प्रमाण मानला पाहिजे.
एक प्रश्न निर्माण होतो की  "आत्मा एकचं आहे"हे संपूर्ण सत्य आहे तो सर्व व्यापी,अनंत,अविनाशी आहे हे जर खरे तर आत्म्यामध्ये अनेकपणाने भरलेले सतत पालटणारे, अंतवत, अपूर्ण द्वतमय जगत् झालेच कसे?असे अनेक प्रश्न निर्माण होतात. आत्मज्ञानी पुरूषाला हा प्रश्न पडत नाही कारण त्याला एकच एक आत्मस्वरूपावाचून इतर काही अनुभवायला येत नाही. अर्थातच आत्मज्ञान नसणारेंना हा प्रश्न येतो. ब्रम्ह निराळे,जग निराळे त्याला पहाणारा निराळा,आणि माझ्या सारखा आणखी मी निराळा. अशा विनाकारण भेदबुद्धीने अनेकपणामध्ये जगणाऱ्या जीवांना हा प्रश्न येतो. तो कसा ते पहा."मी"खरोखरचं आत्मा आहे. पण अज्ञानामूळे देहबुद्धी चा उदय झाला आणि ख-या"मी" पणाचा विसर पडला. तो स्वतः ला देहरूप मानु लागला. त्यामुळे सगळे द्रुष्य विश्व त्याला खरे वाटू लागले.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# विठ्ठल भक्त संत कुर्मदास

आधुनिक केसरी

पैठणमध्ये रहाणाऱ्या 22 वर्षाच्या कुर्मदासने आईला हाक मारली.... आई ये, चल लवकर.... कीर्तनाची वेळ झाली. आई वैतागून म्हणाली, कीर्तन.... कीर्तन.. रोज कीर्तन... गुडघ्यापासून तुला पाय नाहीत, कोपरापासून तुला हाथ नाहीत.... कोण नेईल रोज तुला कीर्तनाला? बरं लहान नाहीस आता. 22 वर्षाचा मोठ्ठा झालाय. आता नाही सहन होत मला तुझं ओझं.
आई, खरं आहे गं तुझं!! मी 22 वर्षाचा घोडा झालोय, पण तुझ्या काहीच उपयोगाला नाही आलो. माझ्या वडीलांनी झुरून झुरून प्राण सोडला. आणी मी जीवंत राहीलो. बिन हाताचा, बिन पायाचा. लंगडा-  लुळा!! त्यात माझा काय गं दोष आई!! आई फक्त आजच्याच दिवस घेऊन चल मला कीर्तनाला. ऊद्या नाही म्हणणार मी तुला...
आईचे डोळे डबडबले. शेवटी आई होती ती. तिने हातपाय नसलेल्या व अंगावर फक्त लंगोट बांधलेल्या कुर्मदासाला पाठीवर घेतलं व कीर्तनाच्या ठिकाणी त्याला सोडुन दिलं. भानुदास महाराजांचं कीर्तन चालू होतं. भानुदास महाराज म्हणजे एकनाथांचे पंजोबा!! किर्तनाला भरगच्च गर्दी. कुर्मदासला चालता येत नाही. परंतु लोटांगण घेत घेत. माणसातून रस्ता काढत-काढत पोटावर फरफटत कुर्मदास समोर आला व पहिल्या रांगेत बसला. गळ्यात तुळशीमाळ. कपाळी टिळा लावलेल्या कुर्मदासावर महाराजांचं लक्ष गेलं. महाराज म्हणाले, आलास कुर्मदासा!!
हो महाराज आलो....
अरे कुणाबरोबर आलास?
महाराज, आईनं आणुन सोडलं...
अरे कशाला आईला त्रास दिलास...  आता घरी कसा जाशील? महाराजांनी विचारलं
नाही महाराज.... आता मला घरी नाही जायचं...
हे ऐकून महाराज म्हणाले, अरे कुर्मदासा आज काल्याचं कीर्तन! हे संपलं की आम्ही निघालो पंढरीला... मग तु कुठे जाशील!! कुर्मदास बोलला, महाराज मी पण येऊ का पंढरीला!!!




अरे कुर्मदासा, तुला कीर्तन ऐकायला आईच्या पाठीवर यावं लागतं... तुला कोण नेईल रे पंढरीला?
एवढं लांब
महाराज तुम्ही फक्त हो म्हणा!! पहा मी येतो का नाही पंढरीला....
महाराज हसत हसत विनोदाने "हो... ये" म्हणाले...
रात्री सर्व वारकरी झोपलेले पाहून...  हे उठले.. स्नान केलं व फरफटत फरफटत लोटांगण घालत पंढरीचा रस्ता धरला...
तांबडं फुटलं... लोक उठू लागले. लोकांना विचारु लागला... अहो महाराज, पंढरीचा रस्ता कोणता हो?
लोक सांगू लागले... इथुन पुढं जा... आणि पुढे जाऊन पुन्हा विचारा...
सकाळी 10 वाजेपर्यंत कुर्मदासानं बिड गाठलं. वेशीवर हनुमंताच्या मंदिरात जाऊन ओरडू लागला... "ऐका हो, ऐका, भानुदास महाराजांची दिंडी पंढरीच्या वाटेवर आहे हो!! कुणी कालवण आणावे... कुणी भाकरी आणाव्या!!
महाराजांची दिंडी येईपर्यंत जेवणाची सोय झाली होती.  भानुदास महाराजांनी बिना हातापायाच्या कुर्मदासाला पाहिलं व आश्चर्यानं विचारलं... कुर्मदासा, कसा आलास रे?
महाराज, तुमच्या "हो" नं मला आणलं.. कुर्मदास बोलला..
महाराजांनी सर्वांना भाजी-भाकरीचं जेवण दिलं... प्रवचन झालं... कीर्तन झालं... हरिपाठ झाला... महाराज म्हणाले आपला ऊद्याचा मुक्काम मांजरसुंबा...
रात्री वारकरी झोपले की, कुर्मदास फरफटत निघाला... खरडत खरडत त्यानं दिवस उगवायला मांजरसुंबा गाठलं...
तिथंही त्यानं हाकार दिला व भोजनाची व्यवस्था केली..... एक-एक मुक्काम मागं पडु लागला... लोळण घेऊन घेऊन अंगाची पुरी चाळण झाली होती... परंतु कुर्मदासाचं ध्येय एकच..... विठुरायाची भेट!!!
येरमाळा, बार्शी... असं करत करत शेवटी लऊळ गाव आलं... कुर्डुवाडीच्या पुढे 7 की.मी वर लऊळ हे गाव. तिथंही कुर्मदासानं भोजन गोळा केलं. दिंडी मागून आली.. सर्वांची जेवणं झाली... कुर्मदास एका कोपऱ्यात विव्हळत पडला होता.
भानुदास महाराज त्याच्याजवळ आले व त्याला म्हणाले, कुर्मदासा, आता फक्त एकंच मुक्काम राहीला आहे... मग तु तुझ्या विठुरायाला भेटशील...
कुर्मदास बोलला... नाही महाराज, आता मी नाही येऊ शकणार पंढरीला...
अरे असं का म्हणतोस कुर्मदासा!! एवढ्या लांब आलास... आणि आता फक्त एका मुक्कामावर आलीय पंढरी!!!
**(उर्वरित उद्याच्या अंकात)**

# लेटलतीफ कर्मचाऱ्यांविरोधात प्रशासन आक्रमक!

## प्रवेशद्वार बंद करत कर्मचाऱ्यांची उपायुक्तांनी घेतली हजेरी




आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महापालिकेच्या लेटलतीफ कर्मचाऱ्यांविरोधात पालिका उपायुक्त संगीता नांदुरकर व उपमहापौर अनिल नागमोते आज ॲक्शन मोडमध्ये आल्याचे बघावस मिळाले आहे. महापालिकेत नेहमीच लेट येणाऱ्या कर्मचाऱ्यांची पालिका उपायुक्त संगीता नांदुरकर व उपमहापौर अनिल नागमोते यांनी गेट बाहेरून बंद करत थेट पालिकेच्या बाहेर बसवून आज चांगलीच हजेरी घेतली आहे.
धुळे महापालिकेत कर्मचारी वेळेवर उपस्थित नसल्याच्या नगरिकांतर्फे वारंवार येणाऱ्या तक्रारी होत्या. यावरून पालिका उपायुक्त संगीता नांदुरकर यांनी चक्क रजिस्टरच गेट बाहेर धरून बसत प्रत्येक कर्मचाऱ्यांचा रोजच्या कामावर येण्याचा टाइमिंग तपासला.



कर्मचाऱ्यांची तीन वेळा उशिरा इंट्री झाली असेल तर त्यांच्यावर हाफ डे लावत कारवाई करण्यात येणार आहे. तर ज्या कर्मचाऱ्यांची रोजच लेट एंट्री होत असेल अशा कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई केली जाणार असल्याचे पालिका उपायुक्त संगीता नांदुरकर व महानगरपालिका उपमहापौर अनिल नागमोते यांनी स्पष्ट केले आहे.




# प्रभुपाद यांनी पाश्चात्य जगाला सोप्या भाषेत भारतीय अध्यात्माचा संदेश दिला : राज्यपाल कोश्यारी

## इस्कॉनचे संस्थापक प्रभुपाद यांच्या जीवनकार्यावरील पुस्तकाचे राजभवन येथे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अमेरिका आणि युरोपीय देश ऐहिक सुखात गुरफटत असताना इस्कॉनचे संस्थापक आचार्य श्रील प्रभुपाद यांनी त्यांना नृत्य, गायन व प्रार्थनेच्या माध्यमातून भारतीय अध्यात्माचा संदेश सोप्या भाषेत दिला, असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आज येथे केले.
इस्कॉनचे संस्थापक आचार्य श्रील प्रभुपाद यांच्या जीवनकार्यावर आधारित 'सिंग, डान्स अँड प्रे' या चरित्रात्मक ग्रंथाचे प्रकाशन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १४) राजभवन येथे संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते. पुस्तक प्रकाशन सोहळ्याला इस्कॉन बंगलोरचे वरिष्ठ उपाध्यक्ष तसेच अक्षयपात्र फाउंडेशनचे उपाध्यक्षचंचलापती दास, हरेकृष्ण चळवळीचे मुंबई प्रमुख अमितासन दास व पुस्तकाचे लेखक - पत्रकार हिंडोल सेनगुप्ता प्रामुख्याने उपस्थित होते.
आपल्या भाषणात राज्यपाल म्हणाले भारतीय संस्कृती चीरपुरतान आहे तशीच ती नित्य नूतन देखील आहे. अध्यात्म हे भारताचे वैशिष्ट्य आहे. देशावर अनेक संकटे आली तरी



देखील अध्यात्म ज्ञान नेहमी अबाधित राहिले. या देशात भगवान श्रीकृष्णाच्या आश्वासनानुसार वेळोवेळी स्वामी विवेकानंद, श्रील प्रभुपाद यांसारख्या प्रभृतींनी जन्म घेतला आहे व त्यांनी अध्यात्म ज्ञान लोकांना दिले आहे असे राज्यपालांनी सांगितले. प्रभुपाद यांचे जीवनचरित्र प्रेरणादायी असून ते लहान मुलांपर्यंत देखील सोप्या भाषेत पोहोचवले पाहिजे अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली.
१९७० च्या दशकात पाश्चात्य देश भारताकडे एक गरीब देश म्हणून पाहत असताना श्रील प्रभुपाद यांनी भारताचे विशुद्ध आणि श्रीमंत अध्यात्मिक ज्ञान जगाला दिले असे लेखक हिंडोल सेनगुप्ता यांनी सांगितले.

# नागपुरात पोल्ट्री फार्ममध्ये शिरले पाणी; 3500 कोंबड्यांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मुसळधार पडणाऱ्या पावसाच्या पाण्याने संपूर्ण जीवन उधवस्त केले आहे. अशातच याचा फटका कोंबड्यांना देखील बसला आहे. नागपूर जिल्ह्यातील देवलापार तालुक्यामधील झिंजरिया शेतशिवारात सचिन मेश्राम यांचा अनेक वर्षांपासूनचा कुक्कुटपालनाचा व्यवसाय आहे. या पोल्ट्री फार्ममध्ये एकूण 8 हजार कॉकरेल कोंबड्या होत्या. त्यापैकी तब्बल 3 हजार 500 कोंबड्यांचा मृत्यू झाल्याने शेतकऱ्याला धक्काच बसला असून तो पुरता हवालदिल झाला आहे.
संततधार पडणाऱ्या या पावसानमुळे 3500 कोंबड्यांचा मृत्यू झाला आहे. बुधवारी पहाटे अचानक मुसळधार पाऊस पडू लागला. आणि पावसाच्या पाण्याला निघायला मार्ग मिळाला नसल्याने त्याच ठिकाणी पाणी बराच वेळच साचून राहिले. त्यामुळे पोल्ट्री फार्मच्या खालच्या भागाने हे पाणी फार्मच्या आत शिरले.आणि दुसऱ्या बाजूने बाहेर निघाले. या पोल्ट्री शेडमध्ये एकूण 8000 कोंबड्या संगोपनासाठी ठेवण्यात आल्या होत्या. यातील जवळपास 3500 पेक्षा अधिक कोंबड्यांचा मृत्यू झाल्याचे फॉर्मर सचिन मेश्राम यांनी सांगितले. यात 30 बॅग पोल्ट्री फीड देखील ओले होऊन खराब झाले. यातील अनेक कोंबड्या या स्वतःचा जीव वाचवण्यासाठी फिडरवर बसले होते. मेलेल्या कोंबड्या आणि खराब झालेले फिड याची एकूण नुकसान रक्कम ही पाच लाख रुपये असल्याचे फार्मरचे म्हणणे आहे. त्यामुळे पोल्ट्री फार्मरला शासनाकडून नुकसान भरपाईची अपेक्षा आहे.
आठवडा भरापूर्वी वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यामधील खुबगाव शेतशिवारात आसोलकर भावंडांचा अनेक वर्षांपासूनचा कुक्कुटपालनाचा व्यवसाय आहे. या पोल्ट्री फार्ममध्ये एकूण 5 हजार 300 कोंबड्या होत्या. मुसळधार पावसाचे पाणी फॉर्मच्या आत शिरल्याने तब्बल 4 हजार 500 कोंबड्यांचा मृत्यू झाल्याने शेतकऱ्याला धक्काच बसला असून तो पुरता हवालदिल झाला आहे. 4500 कोंबड्या मृत्युमुखी पडल्याने या शेतकऱ्याचं दहा ते बारा लाखांचं नुकसान झालं आहे. त्यामुळे सरकारने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी या शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे.
कोंबड्यांना न मिळणाऱ्या भावामुळे फार्मर आधीच त्रासलेले



असतांनाच मुसळधार पावसाने केलेले नुकसान फार्मरला आणखी संकटात ओढले आहे. पावसाचे पाणी शिरल्याने झालेले नुकसान हे कधी न भरून निघणारे आहे. अशा प्रकारे नैसर्गिक आपत्तीने झाल्याने मृत्यूमुळे फार्मर आणखी विवंचनेत पडला आहे.




# जगताप कुटुंबीयांच्या दातृत्वातून टाकळी विंचूर शाळेतील ३० विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** कर्तव्य, कर्तृत्व व दातृत्वाची खाण असलेल्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पहिल्या महिला सभापती सुवर्णाताई जगताप व लासलगाव जि.प. गटाचे कर्तव्यदक्ष जि.प. सदस्य डि.के. नाना जगताप यांनी आपणही समाजाचे देणे लागतो. आपल्या हातूनही गोरगरिबांच्या विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय व्हावी आपल्या परीने त्यांना आधार मिळावा हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून रयत शिक्षण संस्थेच्या टाकळी विंचूर येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या ३० विद्यार्थ्यांना मनाचा मोठेपणा दाखवत स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन मनोहर यशवंत केंगे यांच्या शुभहस्ते गणवेश वाटप करून स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. दहावीत यशस्वीपणे उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचाही दानशूर जगताप कुटुंबियांच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे माजी विद्यार्थी युवासेना उपजिल्हाप्रमुख रविराज शिंदे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक लभडे एस.डी. व केंगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यालयाच्या वतीने जि.प. सदस्य डी.के. नाना जगताप व सभापती सुवर्णाताई जगताप यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.
सदर प्रसंगी स्कुल कमेटी सदस्य राजाराम शिंदे, भास्करराव खुर्दे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आहिरे जे.डी. यांनी केले व तसेच सूत्रसंचालन मुदगुल एस.एस. यांनी केले. उपस्थितांचे आभार अहिरे एम.पी. यांनी केले. कार्यक्रम यशस्वीसाठी विद्यालयातील शिक्षक वळवी आर.के., अहिरे पी.टी., कदम एन.आर., खैरनार एस.एस. यांनी परिश्रम घेतले.



# नवयुगाची नांदी !

आधुनिक केसरी

अमेरिकेच्या नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस अॅडमिनिस्ट्रेशन (नासा) या अवकाश संशोधन संस्थेतर्फे १८ डिसेंबर २०२१ रोजी अवकाशात 'जेम्स वेब' दुर्बीण सोडण्यात आली. आपल्या सौरमालेपलीकडे बरेच मोठे विश्व आहे. तेथील दीर्घिकांचे निरीक्षण करणे हा या दुर्बिणीचा हेतू आहे. याआधी 'हबल' व 'स्पिटझर' या दोन दुर्बिणींनी अत्यंत नेत्रदीपक अशी कामगिरी केली. त्याच्या पुढचे पाऊल 'जेम्स वेब' अवकाश दुर्बिणीने टाकले आणि नेत्रदीपक मनोहारी अवकाश प्रतिमांची मालिका पाठवून नवयुगाची नांदी केली. अवकाशगंगांचे नर्तन आणि अवकाशातील महाकाय खडक, अशनी, तारांगणाचे मनोहारी दर्शन 'नासा'च्या जेम्स वेब दुर्बिणीने १२ जुलैला पाठवलेल्या प्रतिमा मालिकांद्वारे घडवले आणि सर्वांचे डोळे दीपून गेले. याद्वारे यापूर्वी कधी न पाहिलेल्या दूरविश्वाचे भव्य दर्शन होऊ लागले आहे. दहा अब्ज डॉलर खर्चून तयार केलेल्या या अवकाश दुर्बिणीने आपल्याला ही छायाचित्रे पाठवून आपल्या क्षमतेचे दर्शनच जणू घडवले. त्यामुळे अवकाश संशोधन क्षेत्रात एका नवयुगाचा प्रारंभ झाला. जेम्स वेब दुर्बिणीतील तंत्रज्ञान हे आधीच्या दोन दुर्बिणींपेक्षा प्रगत असून त्यात अवरक्त नजीक व मध्य अवरक्त तरंगलांबीचा वापर (इन्फ्रारेड कॅमेरा) करण्यात आला आहे. हे सर्वांत क्रांतिकारी तंत्रज्ञान मानले जाते. त्यामुळे ही दुर्बीण प्रचंड अंतरावरील विश्वाचे सुस्पष्ट दर्शन घडवते. मानवाने अवकाशाची माहिती घेण्यासाठी हा जणू गवाक्षच अवकाशात तयार केला आहे. विज्ञानाला पडलेले अनेक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न ही दुर्बीण करणार आहे. या दुर्बिणीचा निर्मिती काळ २५ वर्षांचा होता. १९८९ मध्ये 'स्पेस टेलिस्कोप इन्स्टिट्यूट' या संस्थेने तसेच 'नासा'ने पुढील प्रगत दुर्बीण तयार करण्यासाठी एक चर्चासत्र आयोजित केले होते. हबल दुर्बिणीची जागा घेणारी ही दुर्बीण अवरक्त किरणांच्या माध्यमातून निरीक्षण करेल, असे १९९६ मध्येच ठरवण्यात आले होते. त्यात चार मोठे आरसे असतील, हेही जवळपास निश्चित होते. नंतर या आरशांची संख्या वाढवण्यात आली. २००२ मध्ये 'नासा'ने या दुर्बिणीसाठी लागणारी साधने तयार करण्यासाठी खगोल वैज्ञानिकांच्या मार्गदर्शनाखाली चमू तयार केले. २००४ मध्ये या दुर्बिणीची बांधणी सुरू झाली. २०११ मध्ये १८ आरसे तयार करून त्याच्या चाचण्या घेण्यात आल्या. २०१२-१३ या काळात दुर्बिणीचे सुटे भाग तयार करण्यात आले व ते नंतर 'गोडार्ड स्पेस फ्लाइट सेंटर' या 'नासा'च्या संस्थेत आणण्यात आले. २०१३-२०१६ या काळात सुटे भाग एकत्र करण्यात आले. त्यात सूर्यसंरक्षित आवरणाचाही समावेश होता. २०१५-२०१६ या काळात दुर्बिणीची प्रकाशीय उपकरणे सज्ज झाली. २१ फूट (साडेसहा मीटर) आकारांचे जे आरसे बसवण्यात आले, ते १८ सुवर्णजडित भागांचे आहेत. नंतर तयार झालेला दुर्बिणीचा भाग 'नासा'च्या जॉन्सन स्पेस सेंटर येथे पाठवण्यात आला. तेथे क्रायोजेनिक कक्षात त्याच्या चाचण्या घेण्यात आल्या. या दुर्बिणीला आधी 'नासा'ने 'नेक्स्ट जनरेशन टेलिस्कोप' असे नाव २००२ मध्ये दिले होते. पण नंतर 'नासा'चे माजी प्रमुख जेम्स वेब यांचे नाव त्या दुर्बिणीस देण्यात आले. १९६१ ते १९६८ या काळात ते 'नासा'चे प्रमुख होते. त्यांच्या वेगळ्या मोहिमांसाठी ते प्रसिद्ध होते.

# पाकिस्तानही श्रीलंकेच्या वाटेवर ?



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**आर्थिक संकटामुळे श्रीलंकेतील परिस्थिती दिवसेंदिवस ढासळत चालली आहे. श्रीलंकेचे राष्ट्रपती गोटाबाया राजपक्षे यांनी देश सोडून पलायन केल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे. भारताकडून श्रीलंकेला शक्य ती मदत केली जात आहे. श्रीलंकेपाठोपाठ आता पाकिस्तानही दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा असल्याची बातमी आहे. पाकिस्तानच्या आर्थिक स्थितीबाबत जगातील आघाडीच्या रेटिंग एजन्सींनी इशारा दिला आहे. फिचकडून १७ देशांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीमध्ये पाकिस्तान, ट्युनिशिया, घाना, इथिओपिया, ताजिकिस्तान, अर्जेंटिना, बेलारूस इत्यादी देशांचा समावेश आहे. एजन्सीने जारी केलेल्या अहवालात पाकिस्तानच्या ढासळत्या अर्थव्यवस्थेमुळे दिवाळखोर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**

पाकिस्तानची सद्य आर्थिक परिस्थिती पाहून असे वाटते की, तोही श्रीलंकेच्या वाटेवर जात आहे. श्रीलंकेतही या परिस्थितीची सुरुवात परकीय चलनाच्या साठ्यात घट झाल्यापासून झाली. यानंतर रेटिंग एजन्सींनी तेथील रेटिंग कमी केले. त्यामुळे श्रीलंकेतील गुंतवणुकीवर परिणाम झाला. एवढेच नाही तर सहज कर्ज मिळणे बंद झाले. सध्या श्रीलंकेचा महागाईचा दर ५० टक्क्यांवर पोहोचला आहे. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या सरकारने विदेशी कर्जाचे हप्तेही भरले नाहीत. नवीन सरकारसाठी ही मोठी समस्या आहे. शाहबाज शरीफ यांच्या सरकारने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीपुढे गुडघे टेकले आहेत. पाकिस्तानवर जवळपास ५१ लाख कोटी रुपये कर्ज असून यापैकी २१ लाख कोटी रुपये विदेशी कर्ज आहे. हे कर्ज पाकिस्तानच्या जीडीपीच्या ७४ टक्के आहे. पाकिस्तानवरील कर्जाचा बोजा सातत्याने वाढत आहे. पाकिस्तानचा परकीय चलनाचा साठा १० अब्ज डॉलरच्या खाली गेला आहे. देशातील महागाईचा दर २० टक्क्यांच्या पुढे गेला आहे. ११ एप्रिलला शाहबाज शरीफ यांचे आघाडी सरकार सत्तेवर आले. तेव्हा डॉलरच्या तुलनेत रुपया १८२ रुपये होता. त्यानंतर त्यात झपाट्याने घट झाली आहे. डॉलरच्या तुलनेत पाकिस्तानी रुपया घसरला असून तो २०० रुपयांच्या पुढे गेला आहे. याव्यतिरिक्त श्रीमंत वर्ग डॉलर्सचा साठा करत आहे. त्यामुळे त्याचा काळाबाजार होत आहे. येथे एका डॉलरसाठी २६० पाकिस्तानी रुपये मोजावे लागत आहेत. पाकिस्तानी रुपयाच्या विक्रमी घसरणीमुळे महागाई आणखी वाढण्याची भीती आहे. जगात मंदीच्या सावटामुळे पाकिस्तानच्या कमाईच्या संधीही मर्यादित होत आहेत. सध्या त्यांच्या कमाईतही वाढ होण्याची शक्यता नाही. तेथील परिस्थिती पाहून गुंतवणूकदारही अंतर राखत आहेत. ज्या देशांशी पाकिस्तानचे व्यापारी संबंध आहेत, तेथे मंदीच्या भीतीने व्यापारात घट झाली आहे. चिंतेचे आणखी एक मोठे कारण म्हणजे जगात मंदीच्या चर्चांमुळे पाकिस्तानात नोकऱ्यांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे.

गेल्या काही दिवसांत, परिस्थिती हाताळण्यासाठी पाकिस्तान सरकारने श्रीमंतांवर सुपर टॅक्स लादणे, लक्झरी वस्तूंच्या आयातीवर बंदी घालणे यासारखी पावले उचलली आहेत. पाकिस्तान आजघडीला ज्या आर्थिक संकटाचा सामना करत आहे, ते काही नवीन नाही. हे एक चक्र आहे. ठराविक कालावधीनंतर पाकिस्तानला पुन्हा पुन्हा अशा संकटाचा



सामना करावा लागतो. प्रत्येक नवीन आर्थिक संकट पाकिस्तानला आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवते. पाकवरील सध्याचे आर्थिक संकट आतापर्यंतच्या संकटांपेक्षा जास्त भयंकर आहे. हे केवळ आर्थिक बाबींशी निगडित नसून व्यवस्थात्मक आणि आर्थिक रचनेलाच धक्का लावणारे आहे. तात्पुरती मलमपट्टी ही काही काळासाठी समस्या थोपवू शकते, परंतु दलदलीत रुतलेल्या पाकच्या अर्थव्यवस्थेच्या मूलभूत समस्या सोडवण्यास असमर्थ आहे. अशावेळी पाकिस्तानला दिली जाणारी कोणतीही आर्थिक मदत ही तात्पुरती उपयोगी पडेल, परंतु ती नव्या संकटाला आमंत्रण देणारी ठरेल. शिवाय, ती परिस्थिती हाताळणे आधीपेक्षा अधिक अवघड होऊन जाईल. कारण या मदतीच्या जोरावर केलेल्या सुधारणा नाखुशीने, अर्धवट आणि संकोच बाळगून केलेल्या असतात. पाकिस्तान सध्या परंपरागत कार्यपद्धतीवरच विसंबून असल्याचे, पूर्वीपासून चालत आलेल्या मार्गानंच जात असल्याचं दिसतंय. अंगावर येणा-या तातडीच्या संकटाकडेच केवळ लक्ष द्यायचे. ते संकट दूर करण्यासाठी जे करता येईल ते करायचं आणि नंतर हातावर हात ठेवून परिस्थिती सुधारण्याची आस लावून बसायचे. जेणेकरून आपण दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याची वेळच येऊ नये. अंगावर आलेल्या तातडीच्या संकटातून तरून जाणे हाच एकमेव उद्देश यामागे असतो.

पाकिस्तानचे मोक्याचे भौगोलिक स्थान लक्षात घेऊन येथील राज्यकर्त्यांनी पाकिस्तानचा आजवर एखाद्या धर्मशाळेसारखा वापर केला आहे. त्यांची ही रणनीती यशस्वी सुद्धा झाली. पाकिस्तानची स्थिती श्रीलंकेपेक्षा वेगळी नाही आणि पाकिस्तानही आर्थिक दिवाळखोर होण्याच्या मार्गावर आहे. राजकीय तज्ज्ञांचे मत आहे की, पाकिस्तानमध्ये आर्थिक संकट वाढले तर पुन्हा एकदा तेथे राजकीय अस्थिरता निर्माण होऊ शकते. कोण जाणे भविष्यात अमेरिकेला आपला राजकीय स्वार्थ साधण्यासाठी पाकची गरज लागू शकते. कदाचित विस्तारवादी चीन आपले हेतू साध्य करण्यासाठी पाकिस्तानवर पैशाची बरसात करेल. मध्य पूर्व आशियातील लष्करी संघर्षात मदतीच्या बदल्यात सौदी अरेबिया व यूएई देखील पाकसाठी आपला खजिना खुला करेल. यापैकी कोणतीही शक्यता नाकारता येत नाही. परंतु पाकिस्तानला कोणीही मदत केली नाही तर या देशाची आर्थिक दिवाळखोरी कोणीच रोखू शकणार नाही. पाकिस्तानला तातडीने मोठी मदत मिळाली नाही, तर येत्या काही महिन्यांत या देशाची स्थिती श्रीलंकेसारखीच होईल, हे खरे आहे. जोपर्यंत अर्थव्यवस्थेतील असमतोल दूर होत नाही तोपर्यंत हा देश दिवाळखोरीकडे वाटचाल करत राहणार आणि त्यातून बाहेर पडण्याचे सारे मार्ग बंद होतील. आज दिसते त्यापेक्षा ही परिस्थिती भयानक असेल.

# यशस्वी होण्याचा मंत्र

आधुनिक केसरी

**हमखास यश संपादन करायचे असेल तर तुमच्या डोळ्यासमोर सतत तुमचे ध्येय स्पष्ट व निश्चित असले पाहिजे. आपल्याला परीक्षेमध्ये किती गुण मिळवायचे आहेत त्याचा आराखडा आधीच तयार असला पाहिजे. परीक्षेत यश का प्राप्त करायचे आहे, हे जर आधीच स्पष्ट असेल तर यश मिळविणे आणखी सोपे होते. यशाचा पुढील जीवनाशी काय संबंध आहे, याची जाणीव असणे आवश्यक असते. परीक्षेतील हे यश जीवनाच्या दूरगामी उद्दिष्टपूर्तीसाठी ते कसे आवश्यक आहे, हे जेवढे लवकर आणि नीट समजेल तेवढे यश मिळवण्यासाठी प्रयत्न सातत्यपूर्ण, नेटाने होऊ शकते. म्हणून तुमचे ध्येय नेहमी डोळ्यासमोर असावे.**

मच्छिंद्र ऐनापुरे
जत जि. सांगली

गेल्या महिन्यात दहावी-बारावी या आयुष्याच्या महत्त्वाच्या टप्प्यातील परीक्षांचे निकाल लागले. यात खरे तर मुलींनीच अधिक बाजी मारली. पण मुलेही काही मागे नव्हते. त्यांनाही चांगले गुण मिळाले. अभ्यास न केलेल्या मुलांची मात्र दांडी उडाली. खरे तर आता दहावी-बारावीची परीक्षा पास होणं अवघड नाही. कारण या परीक्षांमध्ये मुलांना चांगले गुण मिळत आहेत. अगदी शंभराहून अधिक मुलांना दहावीच्या परीक्षांमध्ये पैकीच्या पैकी गुण मिळाले. त्यामुळे शिक्षणतज्ज्ञ टीका करत आहेत. या गुणांना किंमत राहिली नाही. हा गुणांचा फुगवटा आहे. प्रत्यक्षात मुले आणि त्यांची गुणवत्ता मागे आहे, अशी टीका होत आहे. मित्रानों, आपण त्याकडे दुर्लक्ष करत मेहनत केली पाहिजे. जास्तीत जास्त गुण मिळण्याच्यादृष्टीने अभ्यास केला पाहिजे. मनासारखे यश मिळवण्यासाठी जिद्द, मेहनत महत्त्वाची आहे.त्यासाठी काही गोष्टींची काळजी घ्यावी लागणार आहे. नियोजन करावे लागणार आहे. यासाठी काही महत्त्वाचे मुद्दे आहेत, ते समजून घेतले पाहिजेत.

ध्येयाची स्पष्टता-सगळ्यात महत्त्वाचे महणजे आपण ध्येय निश्चित केले पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही क्षेत्रात हमखास यश संपादन करायचे असेल तर तुमच्या डोळ्यासमोर सतत तुमचे ध्येय स्पष्ट व निश्चित असले पाहिजे. आपल्याला परीक्षेमध्ये किती गुण मिळवायचे आहेत त्याचा आराखडा आधीच तयार असला पाहिजे. परीक्षेत यश का प्राप्त करायचे आहे, हे जर आधीच स्पष्ट असेल तर यश मिळविणे आणखी सोपे होते. यशाचा पुढील जीवनाशी काय संबंध आहे, याची जाणीव असणे आवश्यक असते. परीक्षेतील हे यश जीवनाच्या दूरगामी उद्दिष्टपूर्तीसाठी ते कसे आवश्यक आहे, हे जेवढे लवकर आणि नीट समजेल तेवढे यश मिळवण्यासाठी प्रयत्न सातत्यपूर्ण, नेटाने होऊ शकते. म्हणून तुमचे ध्येय नेहमी डोळ्यासमोर असावे.



ध्येय प्राप्तीसाठी प्रयत्न-एकदा का ध्येय निश्चित झाले की, आपण त्यानुसार वाटचाल करायला मोकळे होतो. आत्मविश्वास बाळगल्यास पुढच्या गोष्टी सुकर होतात. ध्येय गाठण्यासाठी क्षमता तुमच्याकडे आहे हा आत्मविश्वास बाळगा. स्वतःबद्दल सकारात्मक प्रतिमा असणे अत्यंत आवश्यक असते, त्यामुळे आत्मविश्वास बाळगा. ध्येय प्राप्तीसाठी भरपूर मेहनत घ्यावी. कारण मेहनतीशिवाय कोणतेही यश मिळवता येत नाही. जर जगावेगळे यश पाहिजे असल्यास प्रयत्न ही जगावेगळेच करावे लागतील, हे उघड आहे. मेहनतीला कधीही घाबरू नका. तुम्ही केलेल्या मेहनतीचे फळ शंभर टक्के तुम्हाला यशप्राप्तीच्या रूपाने मिळणार आहे.

**ध्येय कसे ठरवायचे :** ध्येय ठरवताना कधीही कंजूषपणा करू नका. आपल्या क्षमता आणि कुवतीप्रमाणे ध्येय ठरवा, पण जे मिळवताना थोडा ताण पडेल स्वतःमधील सुप्त क्षमताचा शोध घेऊन त्या उपयोगात आणता येतील. आपल्या क्षमतेचा विचार न करता, अवास्तव ध्येय ठरवू नका. कारण अवास्तव ध्येयाच्या ओझ्याखाली तुम्ही तणावग्रस्त होऊ शकता आणि तणावाखाली यश मिळविणे अवघड असते. महत्त्वाचे म्हणजे फार सोपे आणि सहजसाध्य असे उद्दिष्ट ठरवू नका. जे मिळाल्याने विशेष आनंद वाटणार नाही. तुमचे उद्दिष्ट थोडे आव्हानात्मक असले पाहिजे. उद्दिष्ट नेहमी मनात न ठेवता लिहून ठेवा. कागदावर ठळक अक्षरात, रोज आपल्याला आणि इतरांनी दिसेल अशा ठिकाणी लावून ठेवा. कारण तुम्ही विसरलात तरी इतरांनी तुम्हाला आठवण करून दिली पाहिजे. अनेक वेळा आपली इच्छाशक्ती अपुरी पडते आणि ठरविलेल्या सर्व गोष्टी आपण करतोच असे नाही. म्हणून दुसऱ्यांची मदत सुद्धा महत्त्वाची भूमिका बजावते.

एकाग्रता - ध्येय निश्चित झाले की, तुमचे सर्व ध्यान सतत ध्येयाकडे असू द्या. इतर काही गोष्टी ज्या तुम्हाला ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी आडकाठी आणणाऱ्या असतील त्या सर्व बाबींपासून दूर राहा. महाभारतातील अर्जुनाचे उदाहरण माहिती असेल. 105 कौरव पांडवांमध्ये धनुर्विद्येमध्ये लक्ष्यवेध केवळ अर्जुनाला करता येतो. कारण आपल्या लक्ष्याव्यतिरीक्त दुसरे काही दिसत नव्हते. म्हणून अर्जुनासारखे एकाग्रचित्त बना. सर्व क्षणिक सुख देणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करा. मग बघा यशो-देवता तुम्हाला कशी प्रसन्न होत नाही ते!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# चळवळीतला महानायक : निळू फुले

आधुनिक केसरी

**निळुभाऊंना सिनेमाच्या सुरूवातीच्या काळात एकच प्रकारच्या भूमिका मिळाल्या. पुढारी, सरपंच, सावकार पण त्यातही त्यांनी वैविध्य आणलं. एकच प्रकारची भूमिका पण प्रत्येक सिनेमात ते वेगवेगळे भासत. सुरूवातीच्या काळात दादा कोंडके, अशोक सराफ, राम नगरकर यांच्या जोडीनं तुफान विनोदी, आशयघन आणि तितकेच सामाजिक संदर्भाला धरून असलेले सिनेमे केले. 'गल्ली ते दिल्ली' हा सिनेमा आजही बघा, ५० वर्षांनंतरही तो आजचाच वाटतो. दुसरीकडे तमाशापटांचा सुवर्णकाळ होता. 'पिंजरा' हा निळुभाऊंच्या कारकीर्दीतला आणखी एक मास्टरपीस. खरंतर मास्तर म्हणजे डॉक्टर लागू सिनेमाचे नायक होते. पण निळुभाऊंचा तो साईड रोल एखाद्या नायकापेक्षा कमी नव्हता. जेवढे डॉक्टर लागू आपल्याला लक्षात राहतात तेवढेच निळू फुलेही. १३ जुलै स्व. निळू फुले यांची पुण्यतिथी त्यानिमित्तानं घेतलेला आढावा.**

**आदरांजली**

**अमोल किन्होळकर**
छायाचित्र : गार्गी फुले

निळू फुले लहान असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत जायचे. विचार वगैरे असं त्यामागे काही नव्हतं, फक्त खेळायला मैदान मिळतंय या एकमेव कारणासाठी त्यांनी आणि त्यांच्या मित्रांनी शाखेत जायला सुरूवात केली. ते वय अगदीच अजाणतं होतं. एक दिवस शाखेत सगळ्यांना नावं विचारली, एका मित्रानं नाव सांगितलं 'इबू'. 'इबू' म्हणजे 'इब्राहिम..' झालं, इब्राहिमला सोडून तुम्ही सगळे शाखेत येऊ शकता असं निळू फुलेंना खासगीत सांगण्यात आलं. ही बाब निळूभाऊंना फार काही रुचली नाही. तेव्हा अशीच एक 'राष्ट्र सेवा दल' नावाची संस्था खड्डा पटांगणावर सुरू झाल्याचं कळलं. खेळायला मैदान असल्यानं निळू फुले आणि त्यांच्या मित्रांनी सेवा दलाच्या शाखेत जायला सुरूवात केली. तिथे जाती धर्माची काही बंधनं नव्हती. धर्मनिरपेक्षतेचा पहिला धडा त्यांना राष्ट्र सेवा दलात मिळाला. अजाणतेपणी सेवा दलाच्या शाखेत झालेला प्रवेश आणि तिथल्या सर्वधर्मसमभावाच्या संस्कारामुळे शेवटच्या श्वासापर्यंत निळू फुले सेवा दलाचे सच्चे कार्यकर्ते म्हणून जगले.

ब्रिटिशकालीन पुण्यात शुक्रवार पेठेतल्या खडकमाळ अळीत नीळकंठ कुष्णाजी फुले म्हणजे आपल्या निळुभाऊंचा जन्म झाला. साल होतं 1931. जन्मतारीख ही त्यांनासुद्धा माहिती नव्हती. घरात आई बाबा सोडून अख्खी क्रिकेटची टीम (अकरा भावंडं) होती. असं ते गंमतीनं सांगायचे. घरची परिस्थिती बेताचीच होती. मंडईत त्यांचे दोन गाळे होते. फुलांच्या माळा करुन विकणं, बागकाम करणं, भाजी विकणं अशी अनेक काम करुन घरचा उदरनिर्वाह चालायचा. निळुभाऊंच्या वडिलांनी अनेक कामं केली, उद्योग केले, पण कशातच यश मिळालं नाही. घरात सिनेमाचं, नाटकाचं तसं काहीच वातावरण नव्हतं. शाळेतही त्यांनी कधी सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला नाही.

शिवाजी मराठा हायस्कुल ही निळूभाऊंची शाळा. शाळेत त्यांच्या मराठीच्या शिक्षिका कोण? तर चक्क शांताबाई शेळके. मराठी या विषयाव्यतिरिक्त त्यांना कोणत्याही विषयात रस नव्हता. शांताबाईंचा तास मात्र निळूभाऊ चुकवायचे नाही. मेपासॉ, मॅक्झिम गार्की ही नावं शांताबाईंकडूनच त्यांनी ऐकली. परकीय भाषेतल्या उत्तम कथा त्या शाळेतल्या मुलांना ऐकवायच्या. निळूभाऊंना ते सगळं आवडत होतं. शांताबाईच्या याच शैक्षणिक संस्कारातून निळूभाऊंना कथा कादंबऱ्या, सिनेमाविषयाचं कुतूहल वाटू लागलं. पुढे हाच वाचनाचा वसा त्यांनी जन्मभर सोडला नाही.

शुक्रवार पेठेतली शिवाजी मराठा शाळा हे स्वातंत्र्यपूर्व काळात चळवळीचं केंद्र होतं. बहुजनांच्या शिक्षणासाठीच त्या शाळेची पायाभरणी झाली. श्रीमंत सयाजीराव गायकवाड, कोल्हापुरचे राजाराम महाराज या शाळेला मदत करायचे. सर्व जातीचे, धर्माचे विद्यार्थी सामावून घेणारी ही शाळा होती. समाजसेवी बाबा आढाव, भाई वैद्य हे निळूभाऊंचे शाळेतले मित्र होते. मोहन धारिया या चळवळीशी जोडले गेले. फुले आडनाव ऐकल्यावर बऱ्याच जणांना प्रश्न पडतो की निळू फुले हे महात्मा ज्योतीराव फुले यांचे वंशज का? तर हो, निळू फुले हे महात्मा फुलेंच्या वंशावळीतलेच होते. त्यामुळे चळवळीचा डीएनए त्यांच्या रक्तातच असावा.

1942 च्या 'चले जाव' आंदोलनात निळुभाऊंच्या थोरल्या बंधूंनी सक्रिय सहभाग घेतला होता. पोलिसांचा मार खाल्ला, येरवड्याच्या तुरूंगात कारावास सोसला. तेव्हा निळुभाऊ दहा बारा वर्षाचे होते. एवढ्या कमी वयातही ते आंदोलनात निरोप पोहोचवण्याचं काम करायचे. निळुभाऊंना त्यात मजा यायची. याच काळात त्यांनी गांधीजींना अनेकदा बघितलं. साने गुरूजींच्या अनेक सभांना स्वयंसेवक म्हणून काम पाहिलं. अत्यंत साध्या प्रकृतीचे साने गुरूजी बोलायला लागले की दीड दोन तास सभा गाजवत. किशोरवयात निळुभाऊंवर सेवा दलाच्या माध्यमातून आंदोलन, चळवळ, देशप्रेमाचे संस्कार झाले. पुढे पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरीजनांना प्रवेशासाठी चळवळ उभी राहिली. निळुभाऊ




त्यातही पुढे होते. गोवा मुक्ती संग्रामात सत्याग्रहींसाठी भाकरी जमवल्या. मोरारजींनी सावंतवाडी ते गोवा ही एसटी बंद केली म्हणून मधू दंडवते यांच्या नेतृत्वात 75 मैलांचा पायी प्रवास केला. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात पुण्यात इंदिराबाईंची गाडी अडवली तेव्हा पोलिसांचा मारही खाल्ला. निळू फुले या व्यक्तिमत्वानं त्या मोजक्या वर्षात शांताबाई, साने गुरूजी, दंडवते, प्र. के. अत्रे यांच्या सहवासात आयुष्यभराची शिदोरी जमवली होती.

पुणे गावठाणात तेव्हा नवलोबाची यात्रा भरायची. निळू फुले तेव्हा अगदीच लहान होते. या जत्रेत तमाशा यायचा, तो तमाशा बघणं म्हणजे आनंदाची पर्वणी असायची. उघड्या मैदानावर हजारो लोकांसमोर अभिनय करुन त्यांना तासंतास खिळवून ठेवणं ही कला निळुभाऊंना विलक्षण वाटली. पुढे कलापथाकाच्या माध्यमातून निधी गोळा करण्याची जबाबदारी निळुभाऊंकडे आली. त्याकाळात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन त्यांनी कलापथकाचे फड गाजवले. अनेक मान्यवरांच्या सभेआधी प्रेक्षकांना थांबवून ठेवण्यासाठी समाजप्रबोधन आणि मनोरंजन या दुहेरी हेतूनं कार्यक्रम चालायचे. जेमतेम मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण पूर्ण केल्यावर निळुभाऊंनी माळी कामाचा डिप्लोमा केला आणि पुण्याच्या आर्म्ड फोर्स मेडिकल कॉलेजमध्ये माळी म्हणून नोकरी केली. माळीकाम हे निळुभाऊंचं आवडतं काम. तिथे त्यांनी ११ वर्षे नोकरी केली. AFMC च्या परिसरात आज जी काही मोठी झाडं असतील ती कदाचित निळुभाऊंनीच लावलेली असतील. सुदैवानं बालगंधर्वांचे जावई कर्नल वाबळे तेव्हा गार्डन ऑफिसर होते. सेवा दलाच्या चळवळीविषयी ते जाणून होते. त्यामुळे त्यांनी निळुभाऊंना थेट हेड माळी ही पोस्ट देऊन टाकली. शिवाय सेवा दलाच्या दौऱ्यांसाठी सुट्टीही द्यायचे.

निळुभाऊंना आणखी एक वेड होतं, ते म्हणजे उत्तमोत्तम इंग्रजी सिनेमे बघण्याचं. स्वातंत्र्यानंतरही काही इंग्रज अधिकारी भारतात होते. निळुभाऊ तेव्हा रेसकोर्सवर माळीकाम करायचे. निळुभाऊंची सिनेमाची आवड तिथला एक इंग्रज अधिकारी जाणून होता. त्यामुळे इंग्रजी सिनेमा लागला की तो अधिकारी स्वतःकडचे पैसे देऊन निळुभाऊंना इंग्रजी सिनेमे बघायला पाठवायचा. पुणे कॅम्पमधल्या वेस्ट-एण्ड थीएटरला तेव्हा इंग्रजी सिनेमे लागायचे. रोनाल्ड गोल्डमन, जेम्स डीन, चार्ल्स बोएर, हेपबर्ग यांचे सिनेमे ते आवर्जून बघायचे. निळुभाऊंचा एक मित्र त्याच थिएटरला कामाला होता. तो सिनेमागृह हाऊसफुल्ल असलं तरी प्रवेश द्यायचा. वेस्ट-एण्ड थीएटरच्या दरवाज्यात उभं राहून निळू भाऊंनी अनेक इंग्रजी सिनेमे पाहिले. नंतरच्या काळात टॉम हँकचा फॉरेस्ट गम्प हा सिनेमा त्यांनी सलग तीन दिवस आपली कन्या गार्गीसोबत लक्ष्मी रोडवरच्या विजय टॉकिजमध्ये बघितला. फॉरेस्ट गम्प या सिनेमाच्या कथेवर आणि टॉमच्या अभिनयानं ते भारावून गेले होते. अभिनय कसा असावा तर या दर्जाचा असावा असं ते आपल्या मुलीला गार्गीला कायम सांगत. याशिवाय बंगाली सिनेमा त्यांना विशेष आवडायचा. रवींद्रनाथ टागोरांच्या साहित्यकृती हा त्यांच्या आवडीचा विषय. मल्याळम, तमिळ सिनेमाबद्दलही त्यांना आकर्षण होतं. तिथल्या कलाकारांसारखं काम मराठीतही व्हावं अशी त्यांची इच्छा होती. अशा सर्व बाजूने निळू फुले समृद्ध होत होते.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतातली गावं खेडी आता स्थिरावू लागली होती. त्यामुळे या गावांचा विकास नेमका कसा असावा याचं समाजप्रबोधन आणि मार्गदर्शन करणारी नाटकं त्यांनी बसवली. शिक्षण, शेती, पाणी हे विषय त्यावेळी नाटकात असायचे. राम नगरकर, ज्योती सुभाष, जयवंत दळवी, पुलं देशपांडे ही सगळी लोकं तेव्हा एकत्र काम करायची. 'दोन बायकांचा दादला' हे नाटक निळुभाऊंनी दिग्दर्शित केलं होतं. 'उद्यान' नावाचं नाटक त्यांनी स्वतः लिहिलं होतं. १९५७च्या निवडणुकीदरम्यानं सेवा दलासाठी त्यांनी 'येरा गबाळ्याचे काम नोहे' हे वगनाट्य बसवलं. पु. ल. देशपांडेंच्या 'पुढारी पाहिजे' मधला 'रोंगे' विशेष गाजला. हल्ली नाटकाचे प्रयोग फक्त मुंबई, पुणे फारफार तर नाशकात होतात. पण त्यावेळी जिल्हा तालुक्याच्या ठिकाणी प्रयोग व्हायचे. खूप दौरे केले, उभा महाराष्ट्र निळुभाऊंनी पालथा घातला. ज्येष्ठ साहित्यिक व्यंकटेश माडगूळकर तेव्हा आकाशवाणीसाठी कार्यक्रम करायचे. निळुभाऊंच्या अस्सल ग्रामीण लहेजामुळे माडगूळकरांच्या सगळ्या लोकनाट्यात ते असायचेच. माडगूळकरांचं निळुभाऊंवर अफाट प्रेम होतं. ६०च्या दशकात निळुभाऊंनी कलापथक, लोकनाट्य, नाटक असं खूप काम केलं. यामागे पैसा कमावणं हा उद्देश कधीच नव्हता. प्रत्येक काम त्यांनी सेवा म्हणून केलं. म्हणूनच आयुष्यभर आपल्या उत्पन्नातली ३० टक्के रक्कम त्यांनी दर महिन्याला गरजवंतांसाठी खर्च केली.

नाटक, नोकरी, सेवा दलाचं काम असं सगळं सुरळीत सुरू असताना समाजवाद्यांमध्ये फूट पडली. त्यानंतर निळुभाऊंनी राममनोहर लोहियांच्या संयुक्त समाजवादी पक्षात प्रवेश केला. त्यानंतर 'आंदोलन कलापथका'ची स्थापना केली. बिराजदारांच्या कथेवर आधारीत 'भलताच बैदा झाला' हे लोकनाट्य त्यांनी केली. **(उर्वरित उद्याच्या अंकात)**

# संवेदनशील अनुभव देणारा काव्यसंग्रह 'या निर्णायक काळात'

आधुनिक केसरी

**कवि रविंद्र साळवेंच्या कवितेतून चार्वाक, गौतम बुद्ध, ब्राह्मणी व्यवस्थेला हादरा देणारे संत तुकाराम, आणि समतेचा मंत्र देणारे बाबासाहेब आंबेडकर दृष्टीस पडतात. बाबासाहेबांनी बुद्ध कबीर, फुले यांना गुरु मानले, शिवरायांना वंदन केले, पण अजून काही लोकांना बाबासाहेबांच्या आगेमागे कोणाचे नाव जोडलेले मान्य नाही, इतके लोक संकुचित झाले आहेत. याची जाणीव कवी करून देतात.**

**परीक्षण**

**नरेंद्र इंगळे**
संपर्क क्र. ९५६१२२६५७२

लोकशाहीर वामनदादा कर्डक म्हणतात, "मी चातुर्वर्ण्याची चौकट मोडली, तसाच मी काव्यशास्त्राच्या चौकटीतून मुक्त आहे. मी माणसाचं गाणं लिहीत आलो, मी वाङःमयीन मूल्यांची पर्वा करीत नाही तर आंतरिक उर्मीतून लिहितो"

कवी रविंद्र साळवे लिहितात, बालपणी मी वामनदादांची अनेक गाणी पाठ केली होती... सहाजिकच वामनदादांच्या प्रेरणेतून त्यांच्या 'या निर्णायक काळात' या काव्यसंग्रहाची निर्मिती झाली. बुद्धीप्रामाण्य या संकल्पनेनुसार देव या कल्पनेपेक्षा माणसाला किंमत देणे, धर्म स्वतःपुरता मर्यादित ठेवणे, जातीपातीच्या पलीकडे विचार करणे.. ही पुरोगामी व्यक्तीची लक्षणे आहेत. म्हणून कवी रवींद्र साळवे म्हणतात,

जे जे पटेल ते खा
विनंती एवढीच की
जातीसाठी माती खाऊ नका माणुसकीला
काळीमा लावू नका..

पुरोगामी विचारसरणीचे लोक सुधारणावादी, प्रगतिवादी आणि वैज्ञानिक दृष्टीचे असतात. दैववादी अथवा मनुवादी नसतात. तर आपल्या वागण्या-बोलण्यातून समस्त मानव जातीच्या कल्याणाचा विचार मांडतात. त्यामुळे साळवे यांची कास्तकारांना उभारी देणारी कविता चिंतनीय आहे. ते म्हणतात,

माझ्या शेतकरी भावा
तू देत राहिलास दक्षिणा
मंदिर मठांना अणि ढेरपोट्या भटांना
असा हताश होऊ नको
ज्योतिषाला हात दाखवू नको...

साळवेंच्या कवितेतून चार्वाक, गौतम बुद्ध, ब्राह्मणी व्यवस्थेला हादरा देणारे संत तुकाराम, आणि समतेचा मंत्र देणारे बाबासाहेब आंबेडकर दृष्टीस पडतात. बाबासाहेबांनी बुद्ध कबीर, फुले यांना गुरु मानले, शिवरायांना वंदन केले, पण अजून काही लोकांना बाबासाहेबांच्या आगेमागे कोणाचे नाव जोडलेले मान्य नाही, इतके लोक संकुचित झाले आहेत. याची जाणीव कवी करून देतात.

चार भिंतीत राहून केवळ बायका पोरात रमणाऱ्या आणि फेसबुकवर फोटो टाकणाऱ्या लोकांना लाईक करण्याची कवीची इच्छा होत नाही. ते लिहितात,




तुम्ही कायम दिसता फेसबुकवर
बायकोच्या कमरेला विळखा घालून
पण तुम्ही कधीच कसे दिसला नाहीत
व्यवस्थेने निर्माण केलेल्या प्रश्नावर
चार शब्द बोलताना?

२०१४ नंतर अंधभक्त झालेल्या तथाकथित लोकांवर त्यांनी कवितेतून कोरडे ओढले आहेत. एवढेच नाही तर कळप या कवितेमध्ये संकुचित लोकांनी बनवलेल्या जातीपातीच्या कळपावर आसूड ओढले आहेत.

कविता कशी असावी? हे सांगताना ते म्हणतात,

तू झाडावर लिहितोस
वाऱ्यावर लिहितोस
एखादवेळी आमच्या डोळ्यातल्या
अश्रूंवर लिहून बघ
मग तुला नक्की
कळेल
माणसाचे दुःख काय
ते...

यातून जातीधर्माच्या पलीकडे जाऊन माणसाने एकमेकावर केलेली माया जगामध्ये सर्वश्रेष्ठ आहे असे कवीला सुचवायचे आहे. सगळ्या धर्मग्रंथांचा सार माणूस आणि माणुसकी आहे हे त्यांच्या कवितांमधून दृष्टीस पडते. कवीला बुद्धाच्या अहिंसेवर भरवसा आहे. ते म्हणतात, शब्द हेच माझे शस्त्र आहे, शब्दांचा मारा करून मी वैचारिक लढाई जिंकणार आहे. काळ कोणताही असू देत गांधी आणि नत्थ्याच्या वैचारिक लढाईत मी असेल गांधीच्याच बाजूला.

आताच्या काळातील माणसामाणसातील व्देष पाहून कवीला यातना होतात.

घर जळणे, माणसे मारणे
द्वेष करणे, ट्रोल करणे
राहिले नाही नवे

आता तरी सर्वांनी जागे व्हायला हवे.

निरिक्षण,अभ्यास आणि आकलन यातून कविता सफूरत असते. त्यातूनच कविचा दृष्टिकोन तयार होतो. रवींद्र साळवे यांचे व्यक्तिमत्व व्यापक आहे, आप -परका असा भेदभाव न ठेवता ते रोखठोक लिहितात. सनातनी वृत्तीवर प्रहार करतात. त्याचबरोबर आपल्या कवितेतून सर्वांचे भले व्हावे असा आशावाद सुद्धा बाळगतात.

# कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा..!



ह.भ.प.ज्ञानेश्वर (माऊली) महाराज पौळकर

आधुनिक केसरी

**गुरुपौर्णिमेचा - आपल्या गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे. आषाढ शुद्ध पौर्णिमा म्हणजेच 'गुरुपौर्णिमा.' व्यासमुनींना गुरुंचे गुरु मानले जाते. त्यामुळे या पौर्णिमेला 'व्यासपौर्णिमा' असेही म्हणतात. गुरुपौर्णिमा ही सद्गुरूंची पौर्णिमा मानली जाते. पौर्णिमा म्हणजे प्रकाश. गुरु शिष्याला ज्ञान देतात. तो ज्ञानाचा प्रकाश आपल्यापर्यंत पोहोचावा, म्हणून गुरूची प्रार्थना करावयाची, तो हा दिवस होय.**

आपण ज्यांच्याकडून विद्या प्राप्त करतो, मिळवतो त्याच विद्येच्या बळावर आपण जीवनात काही तरी करतो. अशा या गुरूंना मान देणे, आदराने कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य होय. महर्षी व्यासांपासून अशी प्रथा रूढ झाली, ती आजमितीपर्यंत कायम आहे.

त्यामुळे व्यासमुनींना आठवले पाहिजे.

ज्यांनी महाभारत, पुराणे लिहिली त्या व्यासमुनींना वंदन करण्याचा, त्यांची पूजा करण्याचा हा मंगलदिन आहे. त्यांच्याएवढे श्रेष्ठ गुरुजी, आचार्य अद्याप झालेले नाहीत, अशी आपली श्रद्धा आहे. शास्त्रात त्यांना साक्षात देवाप्रमाणे मानावे असे कथन आहे. एवढेच नव्हे तर महर्षी व्यास हे भारतीय संस्कृतीचे शिल्पकार आणि मूलाधार मानले जात. ज्या ग्रंथात धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, व्यवहारशास्त्र, मानसशास्त्र आहे असा सर्वश्रेष्ठ ग्रंथ त्यांनी लिहिला. व्यासांच्या कार्यामुळे त्यांना 'वेदव्यास' असे देखील म्हणतात. तसेच व्यासमुनी उच्चासनावर बसून वेदांचे अर्थ सांगत त्यामुळे आजही सभेत वक्ता बोलतो त्या जागेला 'व्यासपीठ' असे म्हणतात.

स्मरण करूया : आपली सर्वांची सर्वात पहिली गुरु म्हणजे आई. त्यानंतर वेळोवेळी योग्य ती शिकवण देणारे वडील, शिक्षक हे देखील आपले गुरु आहेत. मग आयुष्यात विविध टप्प्यांवर गुरुंची गाठ पडत जाते. गुरुपौर्णिमेच्या दिवशी प्रत्येकाने याचे चिंतन करायला हवे की, "हे ज्ञान मिळायच्या आधी आपण कुठे होतो....? आता कुठे आहोत? पूर्वी या ज्ञानाशिवाय आपण कुठे होतो.....??? यातला फरक लक्षात आला की कृतज्ञता भाव येतो. यंदा गुरुपौर्णिमेच्या दिवशी आपल्या गुरुंना काहीही भेटवस्तू दिली तरी खरी गुरुपूजा म्हणजे गुरुंनी आपल्याला जे ज्ञान दिले आहे, जी शिकवण दिली आहे, त्याचे प्रत्यक्षात आचरणात आणणे ही आहे.....!



# महागाई आणि कुप्रशासन यामुळेच श्रीलंकेत उठाव



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**भारताचा शेजारी आणि जुना मित्र असलेला निसर्ग संपन्न श्रीलंका सध्या भीषण आर्थिक संकटात सापडला आहे. श्रीलंकेत जीवनावश्यक वस्तूंचा भीषण तुटवडा पडलेला आहे त्यामुळे महागाई प्रचंड वाढली आहे. दूध, बिस्कीट, पाव, ब्रेड यासाखे पदार्थ विकत घेणेही सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. खाद्यपदार्थांच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. डिझेल, पेट्रोल, घरगुती गॅस मिळणेही मुश्किल झाले आहे. महागाई गगनाला भिडली असल्याने सर्वसामान्य जनतेचे जगणे मुश्किल झाले आहे.**

रासायनिक खतांवर प्रतिबंध घातल्यामुळे धानाचे उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. परकीय चलनाचाही तुटवडा जाणवत आहे. एकूणच श्रीलंकेची सध्याची परिस्थिती ही आणीबाणीचीच आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. श्रीलंकेची अर्थव्यवस्था आयसीयूमध्ये असल्याने श्रीलंका आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभी आहे. श्रीलंकेतील या परिस्थितीला तेथील जनता राजपक्षे कुटुंबाला जबाबदार ठरवत आहे. सध्या श्रीलंकेवर राजपक्षे कुटुंबाचे वर्चस्व आहे. गोटाबाया राजपक्षे यांची राष्ट्रपतीपदी निवड झाल्यावर त्यांनी त्यांचे भाऊ महेंद्रा राजपक्षे यांची पंतप्रधानपदी निवड केली. त्यांचा दुसरा भाऊ चापल याला देखील कॅबिनेट मंत्री केले इतकेच नाही तर पंतप्रधानांचा मुलगा देखील कॅबिनेट मंत्री बनला. श्रीलंकेचे ७५ टक्के राजपक्षे कुटुंबीयांकडेच होते.

एप्रिलमध्ये जेंव्हा श्रीलंकन जनता उठाव करून रस्त्यांवर उतरली होती तेंव्हा राष्ट्रपती गोटाबाया राजपक्षे यांना जाग आली आणि त्यांनी आपल्या भावाला पंतप्रधानपदावरुन हटवले आणि रानील विक्रमसिंघे यांना पंतप्रधानपदी बसवले. गोटाबाया राजपक्षे हे श्रीलंकेचे राष्ट्रपती झाल्यापासून श्रीलंकेची अशी अवस्था झाली आहे. राजपक्षे हे चीनच्या हातचे बाहुले बनले आहे. राजपक्षे यांनी चीनकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले आहे. या कर्जाचा हफ्ता फेडण्यातच श्रीलंकेची तिजोरी रिकामी झाली. श्रीलंकेत गुंतवणूक करण्याच्या नावावर चीनने श्रीलंकेच्या महत्वाच्या बेटांवर कब्जा केला आहे. या बेटातून मिळणारे उत्पन्न चीनच्या तिजोरीत जमा होत आहे.

श्रीलंकेची अर्थव्यवस्था पर्यटनावर अवलंबून आहे मात्र कोरोनामुळे मागील दोन वर्षांपासून श्रीलेंकेतील पर्यटन व्यवसाय ठप्प झाला आहे. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे श्रीलंकेची आजची ही अवस्था झाली आहे. श्रीलंकेला या अवस्थेतून बाहेर काढण्यात राष्ट्रपती गोटाबाया राजपक्षे आणि पंतप्रधान रानील विक्रमसिंघे यांना अपयश येत असल्याने जनतेची सहनशीलता संपून गेली आणि जनता पुन्हा रस्त्यांवर उतरली. जनतेने देशभर सरकारविरोधी प्रदर्शन सुरू केली. हजारो संतप्त नागरिकांनी राष्ट्रपती गोटाबाया राजपक्षे यांच्या सरकारी निवासस्थानावर कब्जा केला. निवासस्थानाची प्रचंड तोडफोड केली. संतप्त नागरिकांच्या भीतीने राष्ट्रपती पळून गेले. आंदोलनकर्त्यांनी पंतप्रधान रानील विक्रमसिंघे यांच्या खाजगी निवासस्थानालाही आग लावली. एकूणच श्रीलंकेची परिस्थिती भीषण स्वरूपाची झाली आहे.

राजपक्षे परिवाराने जे पेरले तेच कापायची वेळ या परिवारावर आलेली आहे. जे सरकार देशातील जनतेला भुके कंगाल करते, त्यांना सत्तेवर राहण्याचा मुळीच अधिकार नसतो. लंकेत जो उठाव झाला आहे. त्याचे पडसाद इतर आशिआई देशात पसरू नये यासाठी इतर देशांनी खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे.

इतिहास साक्षी आहे की ज्या ज्या वेळी क्रांती किंवा उठाव झालेला आहे त्यामागे तत्कालीन सरकारचे कुप्रशासन आणि महागाई हीच प्रमुख कारणे आहेत. आताही श्रीलंकन जनतेने जो उठाव केला आहे त्यामागेही हीच कारणे आहेत. जेंव्हा जनतेची सहनशीलता संपुष्टात येते तेंव्हा ती स्थानिक शासनाविरुद्ध उठाव करीत असते अशावेळी भ्रष्टाचारी सत्ताधाऱ्यांना सत्ता सोडावीच लागते.





# प्रेमाचा धुंद पाऊस..!!



रुपाली वागरे/वैद्य
संपर्क क्र. : ९८६०२७६२४१

आधुनिक केसरी

**धुंदपणे कोसळणारा वेडा पाऊस. प्राणप्रिय सखीला आपल्या कवेत घेण्यासाठी आतुरलेला पाऊस. अन्... मिलनासाठी आसुसलेली धरती. प्रीतगंधात चिंब चिंब भिजलेली दोन प्रीतवेडी मनं, एका छत्रीत, पुरते भिजूनही त्यांना कशाचेही भान उरत नाही, नजरेसमोर फक्त ती आणि तीच दिसते.**

या जमान्याची पर्वा नसते ना स्वतःच भान... एक वेगळीच नशा, एक वेगळीच तरारी हा मनभावन पाऊस देऊन जातो. विजेचं अधूनमधून कडाडणं त्यांना भानावर आणत. टप टप थेंबात ते जीवन गीत शोधतात, जणू काही पाऊस जीवनगीत होऊन धुंदपणे कोसळत गंधभारले सूर छेडतोय, त्याच्या लयीवर मंत्रमुग्ध होऊन ते देहभान विसरतात. सुसाट सुटलेला वारा... अंगभर लपेटून ते एकमेकांना नजरेने खुणावतात.

सारी सृष्टी चिंब चिंब... घन अजूनही ओथंबलेले... सूर्य मावळतीकडे झुकलेला... घरट्याच्या ओढीन भिजलेलं पाखरु... पंख फडफडून गगनभरारी घेत. दूरवर घराघरात दिवे लागतात. दूरवरुन कोकीळेचे मंजुळस्वर... दाही दिशात मादक भूल चढवतात. छत्री केव्हाच हवेच्या पंखावर स्वार होऊन उडते. फक्त जाणवत प्रेम... फक्त दिसत प्रेम आणि फक्त प्रेमच. तिच्या नशिल्या डोळ्यातील धुंदी त्याला वेडावते. सूर्य अस्ताला जातो... सृष्टी अंगभर अंधाराच मलमली पांघरुण ओढून गुडूप होते... रातकिड्यांची किरकिर अन् त्याच्या मंदमंद प्रकाशात प्रीतीला नवा साज चढतो. ती भानावर येते. पाऊस केव्हाचा ओसरतो. नदी नाले खळखळून वाहू लागतात. सारी सृष्टी निपचित पहूडलेली असते. ती घड्याळाकडे पाहाते, नजरेने घरी जायाचा इशारा करते. तिला पाहून त्याच मन अजूनही भरलेल नसत. या पावसात त्याच प्रेम अधिकच बहरत. पावसाळा म्हणजे प्रेमाचा, प्रेम व्यक्त करण्याचा अलबेला ऋतू... त्याला फक्त भरभरुन देणच माहित असत. बेभान सृष्टीच्या कुशीत शिरणं अन् तिला नवनिर्मितीचा आनंद बहाल करणं... एवढच त्याला ठाऊक असतं. तिच्या मनातील घालमेल त्याला जाणवते... अस्वस्थ मनाने तो तीला निरोप देतो. ती जाण्यासाठी वळते अन् पाऊस बेभानपणे कोसळतो... ती थांबते... झाडाच्या फांदीतून पाऊस त्यांना पुन्हा भिजवतो.. असा हा पहिला प्रेमाचा धुंद पाऊस... तनामनावर अधिराज्य गाजवतो. धुसर आठवणींना जागे करतो. कुणाला चिंब भिजतांना पाहून... आडोश्याला उभं राहून न भिजलेलही मन ही चिंब भिजवून जातो...!!

कितीही ज्ञान असले तरी बोलता आले पाहिजे
जालना शहरात
भाषणकलेची कार्यशाळा
दर रविवारी २ तास, प्रत्यक्ष सरावातून प्रशिक्षण
✻ व्हाट्सप संपर्क ✻
विनोद जैतमहाल
9823028332
SPEAKER'S ACADEMY
भाषणकलेची कार्यशाळा
Changing lives since 2016

# इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा छाया भोयर यांनी स्वीकारला पदभार

## उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर, माजी अध्यक्षा लता पद्माकर मुळे यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** इनरव्हील क्लब औरंगाबादचा पदग्रहण सोहळा उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हॉटेल विट्स येथे मोठ्या थाटात संपन्न झाला. इनरव्हील क्लब, औरंगाबादच्या मावळत्या अध्यक्षा सौ. लता पद्माकर मुळे यांच्याकडून नूतन अध्यक्ष सौ. छाया भोयर यांनी पदभार स्वीकारला. याप्रसंगी उत्तम वक्ता व अष्टपैलू व्यक्तिमत्व असणाऱ्या ऊपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांनी आपल्या ओघवत्या भाषेत मार्गदर्शन करुन त्यानी उपस्थितांची मने जिंकून घेतली.
नूतन अध्यक्ष सौ. छाया भोयर यांनी त्यांच्या पुढील कार्यकालात पर्यावरण संरक्षणासंबंधी पाणी वाचवा, पाणी जिरवा, झाडे लावा, झाडे जगवा, पावसाच्या पाण्याचे पुनःर्भरण, सौरऊर्जा वापर व निर्मिती यावर भरीव काम करण्याचा मनोदय व्यक्त केला.
मावळत्या अध्यक्षा सौ. लता मुळे यांनी आपल्या कार्यकाळात समाजातील गोरगरीब, कष्टकरी, अनाथ व्यक्तींसाठी तसेच महिलांच्या सर्वांगीण विकास व सबलीकरणासाठी मदत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. तसेच घटकांतील महिला व मुलींना शिक्षणासाठी मदत तसेच त्यांची मोफत वैद्यकीय तपासणी आणि उपचार शिबीर घेऊन मुलींच्या आत्म सुरक्षेसाठी त्यांना प्रशिक्षण दिले असल्याचे सांगितले. इनरव्हीलने सातारा परिसर येथील संकल्प वनराईमध्ये वड, पिंपळ, चिंच, उंबर, कांचन इत्यादी विविध प्रकारच्या देशी वृक्षांचे वृक्षारोपण केले आहे. तसेच तुळशीची रोपे लावून ऑक्सिझोन निर्माण केला आहे. संकल्प वनराई टीमसोबत पर्यावरण संवर्धनाबद्दल सामाजिक बांधिलकी जपली आहे. फक्त वृक्षारोपण करुन न थांबता त्यांचा सांभाळ करून वृक्षसंवर्धनासाठी येथे पाण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली. साठवणुकीसाठी पाच पाण्याच्या टाक्यांची व्यवस्थाही करून दिली आहे. ग्रामीण भागातील जनतेला अंधारामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, त्यामुळे खेड्यातील गरजवंताना सोलर लॅम्पचे केले असल्याचे नमूद केले.



**मावळत्या अध्यक्षा सौ. लता पद्माकर मुळे यांच्याकडून पदभार स्वीकारताना सौ. छाया भोयर.**

इनरव्हील क्लब औरंगाबाद क्लबची नूतन पदाधिकारी पुढीलप्रमाणे अध्यक्ष सौ. छाया भोयर, उपाध्यक्ष डॉ.ईना नाथ, माजी अध्यक्ष सौ. लता मुळे, सचीव मंगल चव्हाण,कोषाध्यक्ष अंजली सावे, आय एस ओ. अंजली दाशरथी, संपादक रेखा केदारे, क्लब वार्ताहर ईंदुमती काळे, कार्यकारी समिती सदस्य- माजी जिल्हाध्यक्ष व सल्लागार ऊषा धामणे, आशा भांड, शामल भोगले, अलका मेहता व वृषाली उपाध्ये, शामल भोगले यांच्या मधुर ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रतिभा धामणे यांनी प्रभावीपणे सूत्रसंचालन केले. डॉ. ईना नाथ यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, डॉ. सुभाष भोयर, डॉ. जयश्री देशमुख, डॉ. उल्हास शिंदे,डॉ. गणेश डोंगरे, डॉ. लता काळे, डॉ. दत्तात्रय शेळके, अशोक आहेर, सुमित भोयर, सौ. सादी भोयर, नात मायरा, बहिण तनुजा तसेच अनेक मैत्रिणींची क्लब सदस्यांसह मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# अगोदर घेतले देवाचे दर्शन मग फोडली दानपेटी

## आडूळ येथील जैन मंदिरात तीन लाखांवर चोरांचा डल्ला



आधुनिक केसरी न्यूज

**आडूळ (औरंगाबाद) :** अज्ञात चोरट्यांनी महावीर चौकाजवळ असलेल्या जैन मंदीरातील दानपेटी फोडून त्यातील तीन लाख रुपये लांबवल्याची घटनाना मंगळवारी (दि १२) रोजी रात्री आडूळ येथे घडली. ही बाब बुधवारी उघडकीस आली. चोरट्यांनी अगोदर देवाचे दर्शन घेतले मग दानपेटी फोडली. दानपेटी फोडणारे चोरटे सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. वेदांतनगर येथील पोलीस अंमलदारांना पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारा मार्फत खबर मिळाली. आडूळ येथील जैन मंदिराची दानपेटी फोडणारे हॉटेल अशोका, रेल्वे स्टेशन परिसर येथे दोन इसम संशयास्पद असल्याचे समजल्यावर पोलीसांनी सदर ठिकाणी जाऊन खात्री केली व विचारपूस केली असता त्यांनी त्यांची नावे 1) सुरज सिंग अमृतसिंग जुन्नी (वय ३०, रा. बनेवाडी), 2) दशरथ साहेबराव बोर्डे, (वय ३८, रा. राजीवनगर औरंगाबाद असे असे असल्याचे समोर आले. पोलीसांनी दोघांना विश्वासात घेऊन त्यांची अधिकची चौकशी केली असता त्यांनी जैन मंदिरातील दानपेटी फोडून रोख रक्कम ३ लाख रुपयांची चोरी केल्याची कबुली दिली.
घटनास्थळी पाचोड पोलीस ठाण्याचे सपोनि गणेश सुरवसे, व पैठणचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ विशाल नेहूल तसेच स्थागुशाचे श्रीमंत भालेराव यांच्या पथकाने भेट दिली.स्थानिक गुन्हे शाखेचे औरंगाबाद ग्रामीण सहाय्यक फौजदार श्री. लहासे, जाधव यांच्या स्टॉफच्या ताब्यात पुढील तपास देण्यात आला आहे. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त डॉ निखिल गुप्ता, उजवला बनकर पोलीस उपआयुक्त परी १, सहायक पोलीस आयुक्त अशोक थोरात, पोलीस निरीक्षक सचिन सानप, पोउनि. कैलास जाधव, पो कॉ अमोल अंभोरे, जमीर बाबू तडवी, मनोज गांगे यांनी दानपेटी फोडणाऱ्या चोरट्याचा चोवीस तासात छडा लावून गजाआड केले आहे.

# टपाल तिकिटावर झळकले रामदास वाघमारे यांचे नाव

## 'शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक' चळवळीची दखल

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** एनजीओ बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशनच्या माध्यमातून राज्यभर जीवन गौरवच्या माध्यमातून वाचन लेखन चळवळ तसेच गोरगरीब अनाथ निराधारांना 'एक हात मदतीचा' या नाविन्यपूर्ण उपक्रमांची दखल घेऊन औरंगाबाद शहरातील तंत्रस्नेही शिक्षक, विश्व दलित परिषद शिक्षक आघाडी महाराष्ट्र राज्य प्रमुख रामदास वाघमारे यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांच्या नावाच्या उल्लेखासह टपाल तिकीटचे माय स्टॅम्प प्रकाशन सहाय्यक डाक अधीक्षक दक्षिण विभाग टी.एफ. तडवी, गारखेडा परिसर सहाय्यक पोस्टमास्टर श्रीमती लता बनकर, पोस्टमन ए.बी. मगरे, महादेव पंडित, श्रीमंत खाडे, विशाल वेताळ, डी.डी. कुलकर्णी, भरत गवळी, निलेश जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.
या पोस्टाचे तिकीट विश्व टपाल तिकीट प्रदर्शनी तसेच पोस्टल म्युझियममध्येही ठेवले जाईल, असे वर्ड पार्लमेंट सदस्य विश्व शांतिदूत डॉ. सुधीर तारे यांनी कळविले आहे. माय स्टॅम्प टपाल तिकीट विद्यार्थी, पालकांमध्ये व्यसन मुक्तीच्या बाबतीत समाज प्रबोधनाद्वारे नवचैतन्य व जागरूकता निर्माण करण्याचे कार्य राज्यभर करत आहेत. महाराष्ट्रातील विविध शाळेत 'एक हात मदतीचा' या नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत निःशुल्क शालेय साहित्याचे वाटप करुन मार्गदर्शन व अन्य सेवांची उपलब्धता शैक्षणिक मासिक जीवन गौरवच्या माध्यमातून राज्यभर केली जात आहे.
वाघमारे यांच्या याच कार्याची दखल टपाल खात्याने घेतली असून त्यांच्या नावाचे तिकीट प्रकाशित केले आहे.
वाघमारे यांच्या या यशाबद्दल खासदार प्रो.डॉ. सुनिल गायकवाड, आमदार अतुल सावे, आमदार सुभाष झांबड, जालिंदर शेंडगे प्रदेश सरचिटणीस तथा शहर जिल्हा प्रभारी अनुसूचित जाती मोर्चा, औरंगाबाद उपसंचालक अनिल साबळे, नाशिक उपसंचालक डॉ.बी.बी. चव्हाण, माध्यमिक




शिक्षणाधिकारी एम.के. देशमुख, जिल्हा परिषद पतसंस्थेचे सचिव व अधीक्षक प्रदीप राठोड, संत कबीर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव ॲड. धनंजय बोरडे, सर्वोदय कला मंडळ संस्थेचे अध्यक्ष सुभाष पाटील, मुख्याध्यापिका निर्मला व्यवहारे, छत्रपती प्राथमिक विद्यालयाचे शिक्षक वृंद आण्णा आंधळे, काकासाहेब निकम तसेच औरंगाबाद पत्रकार संघटनेच्यावतीने अभिनंदन व कौतुक केले जात आहे.
वाघमारे यांच्यामार्फेत 'एक हात मदतीचा' या नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत खुप मोठी चळवळ महाराष्ट्रात राबविली जाते. शाळा तिथे 'वाचन लेखन चळवळ' या अनुषंगाने निःशुल्क विद्यार्थी शिक्षक यांच्यासाठी निबंध स्पर्धा, लेख स्पर्धा, शिक्षक कार्यशाळा, परीक्षा मार्गदर्शन, वृक्षारोपण, व्याख्यानेही आयोजित केली जातात. लवकरच निःशुल्क विद्यार्थी भाषण स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेण्यात येणार आहे. पालक विद्यार्थ्यांमध्ये तसेच विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.



# सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा २०२२ : गुरुकुल ऑलम्पियाड स्कूल अंतिम फेरीत दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय औरंगाबाद यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या शुभ्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत गुरुकुल ऑलम्पियाड स्कूलच्या मुलींनी 17 वर्षखालील गटात अंतीम फेरीत मजल मारली. विभागीय क्रीडा संकुल औरंगाबाद येथे पार पडलेल्या सेमी फायनल सामन्यामध्ये गुरूकुल ओलम्पियड स्कूल आणि पोदार सीबीएसई या संघात अतिशय चुरशीच्या झालेल्या उपांत्य सामन्यात दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले, पण वेळ संपेपर्यंत दोन्ही संघ गोल करण्यात अपयशी ठरले. शेवटी पेनल्टी शुट ऑऊटमध्ये गुरुकुल ओलम्पियड स्कूल ने 3-0 या गोल फरकाने हा सामना जिंकला. संघातर्फे आर्या कुमारी, वैष्णवी शेजुळ, अनिहा वीर यांनी प्रत्येकी 1 गोल केला.
या उत्कृष्ट प्रदर्शनानंतर शाळेच्या संपूर्ण शिक्षक वर्गाने यशस्वी खेळाडू आणि प्रशिक्षक यांचे अभिनंदन केले आणि यशस्वी खेळाडूंना अंतिम सामन्यासाठी शुभेच्या दिल्या. यशस्वी संघाला मुख्याध्यापक डॉ. सतीश तांबट, गणेश साळुंके, श्रीमती पुजा मॅडम, श्रीमती कविता मॅडम, क्रीडा विभाग प्रमुख अविनाश यांचे मार्गदर्शन मिळत आहे.

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
● घाऊक आणि किरकोळ
● किराणा, सुका मेवा, मसाले
● क्रॉकरी, घरगुती उपकरणे
● घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
● प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# श्री क्षेत्र सरला बेटावर महंत रामगिरी महाराजांकडून पूर परिस्थितीची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज



**गंगापूर :** नाशिक भागात सोडलेल्या पाण्यामुळे गोदावरी नदीला पूर परिस्थिती निर्माण झाल्याने आज व्यास पौर्णिमा /गुरुपौर्णिमा बेटात महंत रामगिरीजी महाराज यांनी साध्या पद्धतीने साजरी करत पूर परिस्थितीची पाहणी केली. आज गुरुपौर्णिमा व्यासपूजन निमित्त श्री क्षेत्र सरला बेट येथे आज विविध कार्यक्रम संपन्न होणार होते मात्र नाशिक जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे त्या भागातील धरणांमधून मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्यामुळे गोदावरीला पूर परिस्थिती निर्माण झाली आहे.

प्रशासनाने बेटाकडे येण्यास भाविकांना मज्जाव करत घरीच गुरुपौर्णिमा साजरी करण्याचे आव्हान महंत रामगिरीजी महाराज यांनी आपल्या लाखो भाविकांना आपल्या घरीच गुरुचे स्मरण करून पूजा विधी करण्यास सांगितले होते. त्यामुळे महंत रामगिरीजी महाराज यांनी बेटातील योगीराज सद्‌गुरु गंगागिरी महाराज ब्रह्मलीन नारायण गिरी महाराज यांच्या समाधी स्थळावर जलाभिषेक करून व्यासपूजन गुरुपौर्णिमा साध्या पद्धतीने साजरी केली तर नंतर परिसरातील पूर परिस्थितीची पाहणी यावेळी महंत रामगिरीजी महाराज यांनी केली. याप्रसंगी उपस्थित असलेले माजी बांधकाम सभापती संतोष पाटील जाधव यांनी भाविकांच्या सुविधेसाठी श्री क्षेत्र सरला बेटावर मोठा उंचीचा पूल बांधावा जेणेकरून भाविकांना सुलभता येईल यासाठी भाविकांच्या वतीने त्यांनी सरकारकडे मागणी केली.

याप्रसंगी याप्रसंगी आमदार रमेश पाटील बोरणारे, माजी अर्थ बांधकाम सभापती संतोष जाधव, शिक्षण व आरोग्य सभापती अविनाश पाटील गलांडे, माजी नगराध्यक्ष दिनेश परदेशी, बंडू पाटील वाणी, उद्योजक महेंद्र गोडगे, बाळकृष्ण कापसे, सचिन दिघे, बाबासाहेब कांदळकर, बाबासाहेब दिघे, दत्तू पाटील खपके, सरला बेटाचे विश्वस्त मधुकर महाराज आदी उपस्थित होते.

**नाशिक जिल्ह्यात जोरदार पाऊस झाल्याने गोदावरी नदीत ऐंशी हजार क्यूसेसने पाण्याचा विसर्ग केल्याने सरला बेटावर पूर परिस्थिती निर्माण झाल्याने सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता. त्यामुळे गुरुपौर्णिमा सोहळ्यासाठी बेटावर कोणत्याही भक्तांनी येऊ नये असे आवाहन सरला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांनी भक्तांना आवाहन केले होते त्यामुळे याठिकाणी भक्त आले नाही मात्र दुपारनंतर पूर ओसरायला सुरुवात झाली आहे.**

**शरदचंद्र रोडगे**
**सहायक पोलीस निरीक्षक, विरगाव पोलीस ठाणे**



## उपशिक्षणाधिकारीपदी निवड झाल्याबद्दल कु.शारदा सरजने यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खामगाव :** गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने नुकतेच उपशिक्षणाधिकारीपदी निवड झाल्याबद्दल कु.शारदा कैलास सरजने यांचा जेष्ठ साहित्यिक तथा सामाजिक कार्यकर्त्या, शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती खामगाव, वनश्री ऊर्मिलाताई ठाकरे यांचे हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमाला जनुना गावच्या सरपंच सुवर्णा गोरे या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होत्या.

बुलडाणा जिल्हा, खामगाव तालुक्यामधील चिंचपूर या खेड्यातील अतिशय, मेहनती, सुस्वभावी अभ्यासू व कुशाग्र बुद्धीची... वयाच्या 24 व्या वर्षी कु.शारदा सविता कैलास सरजने यांची नुकतीच MPSC राज्य सेवा मधून उपशिक्षणाधिकारीपदी निवड झाली आहे. पहिल्याच फेरीत त्याही परीक्षा पास झाल्या आहेत. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. अतिशय हलाखीच्या परिस्थितीतून आई-वडिलांनी कु.शारदा यांचे शिक्षण पूर्ण केले. वडिल चिंचपूर येथे पोस्टमन आहेत तर आई गृहिणी आहे. कु.शारदा सरजने यांचे शालेय शिक्षण नवोदय शेगाव इथे तर IISER पूणे येथून BSMS ची डिग्री पूर्ण केलेली आहे.

यावेळी सविता सरजने, गीता सरजने, संपूर्ण सरजने परिवार, संदीप गोरे, उषाबाई वाघमारे, गजानन कोळसे, विजय मनसुबे, अतुल कळमकार आदि कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अमोल गोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन मनोज सुडोकार यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी विलास गोरे, मधुकर डवंगे, चंद्रकांत हरमकार, दत्तात्रय धाडकर यांनी अथक परिश्रम घेतले.

## तारेच्या कुंपणात वीजप्रवाह सोडणे धोकादायक

### पावसाळ्यात विद्युत अपघात टाळण्यासाठी घ्या खबरदारी : महावितरणचे नागरिकांना आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** पावसाळ्यात विद्युत अपघात टाळण्यासाठी सुरक्षिततेचे सर्व नियम पाळण्याचे व खबरदारी घेण्याचे आवाहन महावितरणने नागरिकांना केले आहे.

मुसळधार पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे तुटलेल्या फांद्या वीज वहन तारांवर अडकून पडल्या असल्यास त्या स्वतः काढण्याचा प्रयत्न करू नये. तसेच झाडे पडल्याने वीजखांब वाकला वा मोडला जातो. परिणामी वीजतारा तुटण्याचे प्रकार घडतात. त्यात वीजप्रवाह असण्याची शक्यता असल्याने अशा तुटलेल्या, लोंबकळणाऱ्या वीजतारांपासून सावध राहावे. या तारांना हात लावण्याचा किंवा हटवण्याचा प्रयत्न करू नये आणि त्वरित महावितरणशी संपर्क साधावा. घरात बसवलेल्या मीटरवर पाणी पडत असल्यास किंवा मीटर असलेली भिंत ओली असल्यास त्वरित महावितरणशी संपर्क साधावा. घरामध्ये असलेली विद्युत यंत्रणा व घराजवळ असलेली अर्थिंग मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून तपासून घ्यावी. मीटर बोर्डापासून मोटारीपर्यंत जाणाऱ्या केबल्सना जोड देऊ नये.

तारेच्या कुंपणातून येणाऱ्यास प्रतिबंध करण्यासाठी काहीजण त्यात वीजप्रवाह सोडतात. ते सर्वांना अत्यंत धोकादायक आहे. असे प्रकार कटाक्षाने टाळावेत. चालू स्थितीतील मोटार यंत्र उचलून दुसऱ्या जागी हलवू नये. अंगणात, परसदारी दिवा लावण्यासाठी फ्लेक्झिबल वायर पत्र्यावरून अथवा धातूच्या दारातून अँगलला गुंडाळून नेणे धोकादायक आहे. त्यामुळे सर्व धातूच्या वस्तू विद्युत प्रवाहित होऊ शकतात. घराचे बांधकाम विद्युत वाहिनीखाली अथवा सुरक्षित अंतरापेक्षा कमी अंतरावर करू नका. पोल अर्थिंगच्या वायर्स तोडू नका. त्यामुळे शॉक लागण्याची शक्यता आहे. उंच धातूच्या वस्तू नेताना मार्गातील विद्युत तारांना स्पर्श होणार नाही याची खबरदारी घ्यावी. ट्रक अथवा उंच वाहनांच्या टपावर बसून प्रवास करू नये.

झाड तोडताना त्याच्याजवळ अथवा सानिध्यात विद्युत तारा येत नाहीत ना याची खबरदारी घ्यावी. अशा तारा असतील तर त्यातील वीज प्रवाह महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून बंद करून, सुरक्षित करून मगच अशा फांद्या तोडाव्यात. ग्राहकांनी कोणत्याही विद्युत खांबांना, तारांना, वाहिन्यांना व अन्य उपकरणांना स्पर्श करू नये. तसेच विद्युत खांबांना व उपकरणांना जनावरे बांधू नयेत. त्यास दुचाकी टेकवून ठेवू नयेत किंवा विद्युत खांबांना तार बांधून कपडे वाळत घालू नयेत. घरात शॉर्टसर्किट झाल्यास मेन स्विच तात्काळ बंद करावा. घरावरील दूरचित्रवाणीची डिश किंवा अँटेना वीज तारांपासून दूर ठेवावा. ओल्या कपड्यांवर विजेची इस्त्री फिरवू नये. विजेचे स्विच बोर्ड किंवा कोणत्याही उपकरणाला पाणी लागणार नाही याची दक्षता घ्यावी. विशेषतः टिन पत्र्याच्या घरात राहणाऱ्या नागरिकांनी पावसाळ्यात अतिदक्ष राहून विजेपासून सुरक्षित राहण्यासाठी उपाययोजना कराव्यात. विद्युत वाहिनीवर आकडा टाकून विद्युतपुरवठा घेण्याचा प्रयत्न करू नये.

शेतातील पिकांचे वा फळबागेचे जंगली जनावरांपासून संरक्षण करण्याकरिता तारेच्या कुंपणामध्ये अनधिकृतपणे वीजप्रवाह सोडू नये. अशा प्रकारे जीवित हानी झालेली आहे. पूर किंवा अतिवृष्टीमुळे कोणत्याही क्षणी प्रतिकूल स्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून रोहित्र आणि फिडर बंद करण्यात येतो. त्यामुळे वीजपुरवठा काही कालावधीसाठी बंद होतो. त्यामुळे ग्राहकांच्या वीजपुरवठा बंद होण्याच्या तक्रारी वाढतात. अशा स्थितीत संभाव्य धोका/ अपघात टाळण्यासाठी नागरिकांनी महावितरणला सहकार्य करावे.

शहरी व ग्रामीण भागातील वीजग्राहकांसाठी 24 तास सुरू असणाऱ्या कॉल सेंटर्सचे 1912, 1800-102-3435 किंवा 1800-233-3435 हे टोल फ्री क्रमांक उपलब्ध आहेत. वीजसेवेच्या तक्रारींसह अतिवृष्टी किंवा वादळामुळे वीजपुरवठ्यात तांत्रिक बिघाड होऊन दुर्घटना होण्याची शक्यता आहे अशा ठिकाणांची माहिती टोल फ्री क्रमांकांवर देण्यात यावी. शहरी व ग्रामीण भागातील वीज ग्राहकांचे तक्रार निवारण व्हावे म्हणून प्रत्येक मंडल कार्यालयात दैनंदिन संनियंत्रण समितीचे कक्ष 24 तास कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. त्यांचे मोबाईल क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत. औरंगाबाद शहर मंडल – 7066042412, औरंगाबाद ग्रामीण मंडल – 7875756652, जालना मंडल – 7875764144, बीड मंडल – 7875176464, उस्मानाबाद मंडल – 7875211615, लातूर मंडल – 7875762021, नांदेड मंडल – 7875473980, हिंगोली मंडल – 7875447143, परभणी मंडल – 7875476326



## कळमेश्वरमध्ये आढळले मुलासह दोघांचे मृतदेह

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** सावनेर जवळील केळवदमधील स्कॉपिओ पुलावरून नाल्यात पडली आणि सहाही जण पुरात वाहून गेलेल्या मुलासह आणखी दोघांचे बुधवारी सायंकाळी कळमेश्वर येथे मृतदेह आढळून आले. दादू नरेंद्र चौकीकर (१३) व नीमू आठनेर (४५, रा.जामगाव, बैतुल) अशी मृतकांची नावे आहेत. चालक विकास ऊर्फ बबलू हिवरे (३८, रा.झिंगाबाई टाकळी) हा अद्यापही बेपत्ता असून पोलिस त्याचा शोध घेत असून, आतापर्यंत पाच जणांचे मृतदेह आढळून आले.

मंगळवारी मुलताई येथून रोशनी नरेंद्र चौकीकर (३५), दादू नरेंद्र चौकीकर, चालक विकास ऊर्फ बबलू हिवरे, मधुकर पाटील (६०), निर्मला मधुकर पाटील (५५, दोन्ही रा. दातोरा मुलताई जि. बैतुल) व नीमू आठनेर हे नांदागोमुख येथील नातेवाइकाकडे कार्यक्रमाला आले. कार्यक्रम आटोपून दुपारी ३ वाजताच्या सुमारास ते (एमएचए ३१- सीपी -०२ ९९) मुलताईकडे जात होते. केळवद पोलिस स्टेशनअंतर्गत येणाऱ्या नांदागोमुख छत्रापूर मार्गावरील नाल्याला पूर आला होता. पुलावरून पाणी वाहत असतानाही चालक विकासने पुलावरून स्कॉपिंओ काढली. पाण्याच्या प्रवाहात स्कॉपिओ पुलावरून नाल्यात पडली आणि सहाही जण वाहून गेले. केळवद पोलिसांनी नागरिक व पट्टीच्या पोहणाऱ्यांच्या मदतीने शोध घेतला असता रोशनी, मधुकर व निर्मला यांचे मृतदेह आढळले. रात्र झाल्याने शोधकार्य थांबविण्यात आले. केळवद पोलिस स्टेशनचे ठाणेदार अमितकुमार आत्राम यांच्या नेतृत्वात पोलिसांनी बुधवारी सकाळी पाच पुन्हा शोधकार्य सुरू केले. कळमेश्वर परिसरात दादू व नीमू या दोघांचे मृतदेह पोलिसांना आढळले. चालक बेपत्ता असून त्याचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती केळवद पोलिसांनी दिली.



# हिवरखेडा (नां) सोसायटी चेअरमनपदी अब्दुल अजीज सांडु पटेल तर व्हा.चेअरमनपदी साईनाथ दत्तु मगर यांची बिनविरोध निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** हिवरखेडा (नां) सोसायटी चेअरमनपदी अब्दुल अजीज सांडु पटेल तर व्हा.चेअरमन पदी साईनाथ दत्तु मगर यांची बिनविरोध निवडीनंतर स्व.अशोकराव मगर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून नवनिर्वाचित चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ तसेच ग्रामस्ततर्फे अभिवादन करण्यात आले. नवनिर्वाचित संचालक रामकृष्ण सर्जेराव मगर, सदाशिव पुंजाबा मगर, शेकनाथ आसाराम बडोदे, बाळासाहेब धनेधर, दिलीप दिलावर शहा यांचे ग्रामस्थातर्फे उत्साहत स्वागत केले. या निवडीसाठी ॲड. किरण अशोकराव मगर, राजू मगर, गोकुळ मगर, रमेश मगर, शेखर मगर, मेहमूद पटेल (सरपंच) आदींनी मेहनत घेतली.

कन्नड तालुक्यातील राजकारणात सतत चर्चेत असणारी हिवरखेडा नांदगीरवाडी सोसायटी यावेळी अत्यंत चुरशीची झाली. कृषी उत्पन्न बाजार समिती व जिल्हा बँकेच्या इलेक्शन रणनीती करिता सोसायटी ताब्यात असणे महत्वाचे असते. गावात दर पंचवार्षिक ला दोन गट असायचे पण यावेळी तिसरा गट सक्रिय झाला आणि सोसायटीच्या निवडणुकीत रंगत आली. उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर जिल्हा सहकारी बँक तथा बाजार समितीचे संचालक अशोकराव मगर यांचे आकस्मिक निधन झाल्याने निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रिया पुढे ढकलली. अशोकराव मगर यांच्या निधनानंतर सोसायटी बिनविरोध निवड करावी म्हणून ग्रामस्थानीं बरेच प्रयत्न केले परंतु काही उमेदवार माघार घेण्याच्या तयारीत नसल्याने तीनही पॅनल मध्ये चुरशीची लढत झाली. यात नवीन स्थापित झालेल्या तिसऱ्या आघाडीने अनपेक्षित बाजी मारत 10 उमेदवार निवडून आणले. आतापर्यंत सत्तेत असणाऱ्या पहिल्या आघाडीस केवळ दोन जागा मिळाल्या तर दुसऱ्या आघाडीचा एकमेव उमेदवार चिठ्ठीवर विजयी घोषित करण्यात आला.



**स्वर्गीय अशोकराव मगर यांनी संस्था तीन दशकापासून त्यांच्या ताब्यात घेऊन उत्तम प्रकारे सांभाळली. हिवरखेडा कार्यकारी संस्था तालुक्यातील प्रगतिशील संस्थेपैकी एक संस्था असून ऑडिड वर्ग अ मध्ये आहे. स्व. अशोकराव मगर यांनी हिवरखेडा कार्यकारी संस्थेमार्फत कन्नड कृषी उत्पन्न बाजार समिती, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक येथे तालुका व जिल्ह्यातील राजकारणात वर्चस्व प्रस्थापित केले होते. यापुढे सर्व सभासद मिळून संचालकांच्या माध्यमातून संस्थेमार्फत शेतकरी हिताची कामे करू.**

**महेमुद पटेल**
**मा. सरपंच हिवरखेडा (ना)**

तिसऱ्या आघाडीस 10 जागा मिळून स्पष्ट बहुमत मिळाले पण राजकारणातील कौशल्य व चातुर्य निवडून आलेले उमेदवार एक राहणे यात होते. निवडणूक अधिकारी यांनी अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीसाठी तारीख घोषित केली आणि तिसरी आघाडीतील निवडून आलेल्या सर्वांनी पदाकरिता कंबर कसली. तिसऱ्या आघाडीच्या बेबनाव पाहून पहिल्या व दुसऱ्या आघाडीने याचा फायदा घेत तिसर्या आघाडीतील उमेदवार आपल्या सोबत घेऊन तेरा संचालकांपैकी सात संचालक निवडणुकीस गैरहजर राहिले त्यामुळे कोरम पुणे न झाल्यानेसोसायटी अध्यक्ष व उपाध्यक्ष निवड लांबली.

दरम्यान तिसऱ्या आघाडीस यश मिळूनहीआपसात पद मिळू शकले नाही. निवडणूक अधिकारी यांनी अध्यक्ष निवडणूक जाहीर केली असता त्यात अध्यक्ष म्हणून अब्दुल अजीज सांडू पटेल तर उपाध्यक्ष पदी साईनाथ दत्तात्रय पा. मगर यांची वर्णी लागली. पहिल्या व दुसऱ्या आघाडीने तिसऱ्या आघाडीच्या काही संचालकांना सोबत घेत सोसायटी पुन्हा आपल्या ताब्यात ठेवल्याने या निवडणुकीची तालुक्यातील जनतेत चर्चा ढवळून निघाली. पहिल्यांदा तिसरी आघाडी स्थापन झाली मात्र पदाच्या लालसेपोटी जास्त काळ टिकू शकली नाही. या निवडणुकीचे परिणाम आगामी काळात येणाऱ्या ग्राम पंचायत निवडणुकीत तिसरी आघाडी होण्यावर आशंका निर्माण करतात.

# पूरात वाहून गेल्याने एकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मागील आठवड्यापासून तालुक्यात कोसळधार सूरू आहे. अनेक गावात पुराचे पाणी शिरल्याने ग्रामस्थांना सूरक्षीतस्थळी हलविण्यात आले. तीन गावांचा संपर्क तुटला असून पूरात एक जण वाहून गेल्याने मृत्यू झाला आहे. सुधा प्रकल्पासह पुर्ण तलाव शंभर टक्के भरले आहेत. संततधार पावसाने तालुक्यातील जनजीवन विस्कळित झाले आहे.

**भोकर तालुक्यातील घटना; तीन गावांचा संपर्क तुटला**

विश्रांती घेतेलेल्या पावसाने तालुक्यात जोरदार एन्ट्री केली आहे. नदी-नाल्यांना पूर आल्याने शेतीशिवारात पाणी शिरले आहे. नांदा बुद्रुक, धानोरा, बोरगाव येथील पुलावरून पाणी वाहत असल्याने तीन गावांचा संपर्क तुटला आहे. तहसीलदार राजेश लांडगे, गट विकास अधिकारी अमित राठोड यांनी बुधवारी (ता.१३) तालुक्यातील पूरपरिस्थितीचा आढावा घेतला आहे. रेणापूर येथील काही घरात पाणी शिरल्याने ग्रामस्थांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे. सुधा प्रकल्पासह पुर्ण तलाव शंभर टक्के भरले आहेत.

तालुक्यातील सर्व नदी-नाले पुराने वेढले असून बुधवारी दुपारी बारा वाजताच्या सुमारास सिताराम नाईक तांडा (ता.भोकर) येथील चरण रामधन राठोड (वय ४५) हा इसम पुरात वाहून गेल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. भोसी येथील रूग्णालयात शवविच्छेदन करून त्याचा मृतदेह नातेवाईकांकडे सूपूर्द करण्यात आला आहे, अशी माहिती तहसीलदार राजेश लांडगे यांनी दिली आहे.



# डान्सर आणि कोरिओग्राफर सचिन शर्माचा वाढदिवस बॉलीवूडच्या दिग्गजांसह मोठ्या थाटामाटात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** विशाल जेठवा, रवी दुबे, फैसल खान, सना खान सिद्धार्थ निगम, दिलीप सेन यांच्यासह अनेक सेलिब्रिटींनी डान्सिंग सुपरस्टार सचिन शर्मा (मर्दानी २ फेम) यांच्या वाढदिवसाला हजेरी लावली होती. नृत्यविश्वातील लोकप्रिय नाव, सचिन शर्माने आपला २४ वा वाढदिवस कुटुंब, मित्र आणि चित्रपटसृष्टीतील अनेक सेलिब्रिटींसोबत साजरा केला. केक कापून उत्सवाची सुरुवात झाली. डान्स फ्लोअर खुला होता जिथे सेलिब्रिटी संगीतावर नाचत होते. नृत्य, संगीत, मौजमजेचे वातावरण होते.

सचिनच्या डेब्यू म्युझिक व्हिडिओ 'टूटी मोहब्बत' च्या पोस्टरचे अनावरण करण्यात आल्याने हा खरोखरच दुहेरी उत्सव होता. चमकदार नर्तक आणि प्रचंड लोकप्रिय यू ट्युबर सचिन शर्माला अभिनयाची आवड आहे आणि या संगीत व्हिडिओद्वारे त्याने पडद्यावर अभिनेता म्हणून आपला प्रवास सुरू केला आहे. सचिन म्हणाला, नृत्याव्यतिरिक्त, मला अभिनयाची आवड नेहमीच होती. आज 'टूटी मोहब्बत' या म्युझिक व्हिडिओने माझे स्वप्न साकार झाल्याचा मला आनंद आहे. तसेच आणखी दोन म्युझिक व्हिडिओ लवकरच प्रदर्शित होणार आहेत. यापैकी एक व्हिडिओ आंतरराष्ट्रीय सहकार्याने बनवले आहे. काही वेळाने मी तुम्हाला याबद्दल सांगेन. आता 'टूटी मोहब्बत' साठी चीअर करत आहे.

संगीतकार दिलीप सेन, मर्दानी २ फेम विशाल जेठवा, रवी दुबे, फैसल खान, सिद्धार्थ निगम, दानिश, सना खान, कार्तिकेय मालवीय, क्रिश चौहान, डीजे रिंक, अली मर्चंट, प्रियांका खेरा, आकृती अग्रवाल, दीपक जोशी, निशा गुरगा हॅरी वर्मायांसारखे सेलिब्रिटीउपस्थित होते. रमाकांत मुंडे, आराधना शर्मा, देविश, नमित, आयरा ज्योतिका टांगरी, स्मृती भटिजा, ज्योती गुप्ता, प्रवीण चंद्रा, रुबी सिंग बर्थडे बॉय ला शुभेच्छा देण्यासाठी पोहोचले. रात्री उशिरापर्यंत पार्टी सुरू होती.

सचिन शर्माने २०१२ मध्ये डान्स इंडिया डान्स लिटिल मास्टर्समधून पदार्पण केले. त्यानंतर त्यांचा नृत्याचा प्रवास पुढे गेला आणि त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. तो डान्स इंडिया डान्सचा फर्स्ट रनर अप होता, त्याने झलक दिखला जा, नच बलिये, किचन चॅम्पियन, बिग बॉस इंडियाज डान्सिंग सुपरस्टार, बूगी वूगी किड्स चॅम्पियनशिप इत्यादीसारख्या अनेक डान्स रिॲलिटी शोमध्ये भाग घेतला. त्यानंतर तो नृत्य स्पर्धांना जज करू लागला. या वाढदिवसाच्या पार्टीची जबाबदारी मुंडे मीडियाने (पीआर) अतिशय चोख बजावली.

# सावळदबारा येथील शाळेत महाआरोग्य शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जिल्हा परिषद शाळेत दि. १३ जुलै बुधवार रोजी येथील शाळेत केसुला प्रतिष्ठान व ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या सहकार्याने डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तसेच गोदावरी फाऊंडेशन जळगाव यांच्या वतीने भव्य महाआरोग्य शिबीर ठेवण्यात आले होते. यामध्ये वयोवृद्ध, जेष्ठ नागरिक, महिला, तरुण मंडळी यांनी योग्य त्या तपासणी करून घेतली. जवळपास सव्वाशे ते दिडशे लोकांनी या महाआरोग्य शिबिराचा लाभ घेतला.

ग्रामीण भागात पहिलाच कँप सावळदबारा परिसरात ठेवण्यात आला होता. म्हणून शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या तपासणी शिबिराचे नेतृत्व गोदावरी फाऊंडेशन जळगाव डॉ. उल्हास पाटील ग्रामीण रुग्णालय यांनी केली. परिसरातील जवळपास १२५ ते १५० ग्रामस्थांनी नेत्र तपासणी करण्यात आली. तर इतर काही सर्व आजारावर तपसाण्या करण्यात आल्या. दरम्यान शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी भाजपा माजी जि.प.सदस्य शिवाजी बुढाळ, भाजपा तालुका अध्यक्ष गणेश लोखंडे, महिला सरपंच स्वातीताई भाऊराव पाटील, उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान, पत्रकार रहिमखान, प्राथमिक आरोग्य केंद्राचे व्ही.पी.राजपूत, मुख्यधापक एम.डी.सोनवणे, डॉ. विठ्ठल कोतते, डॉक्टर जफर सय्यद, ग्रामपंचायतच्या वतीने शाल श्रीफळ देऊन या मान्यवरांच्या यांच्या हस्ते गोदावरी फाऊंडेशन जळगाव डॉंक्टर व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रा.जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते), भाजपाचे प्रदीप चव्हाण, मो.तालिब मो.छब्बीर (सामाजिक कार्यकर्ते), प्रा.गजानन चव्हाण देव्हारी, प्रा.मदन डोखळे डाभा, जेष्ठ पत्रकार तथा उपसंपादक गोकुळसिंग राजपूत, भाजपा आण्णा पाटील, स्वानंद पाटील, शिक्षकवर्ग, शिक्षिका, ग्रामपंचायत सर्व सदस्य, आदी कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम परिश्रम घेतले तर आभार प्रदर्शन प्रा.जीवन कोलते यांनी केले.



# जनशक्ती संघटनेचा फलक अज्ञात चोरट्याने पळविला

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील मक्रणपुर गावात पोलीस ठाण्याची रीतसर परवानगी घेऊन थाटामाटात जनशक्ती संघटनेचा शाखेचा फलक लावुन उदघाटन केले मात्र चोट्याच्या डोळयात खुपले. दि 13 जुलै रोजी रात्री अज्ञात चोरट्यांनी फलक पळविला म्हणुनच जनशक्ती शेतकरी संघटनेच्या पद अधिकारी यांनी कन्नड शहर पोलीसांना बोर्ड चोरणाऱ्या चोरट्याचा लवकरात लवकर शोध घ्यावा असे निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष अनिल शेळके, उपजिल्हाध्यक्ष उदय



गवळी, तालुका संघटक गोविंद निकम, तालुका उपाध्यक्ष सचिन शेजवळ, तालुका संघटक शीलाताई नागरे, शाखा प्रमुख अनिता शेजवळ, अन्वर बागवान, संतोष गिरी यांच्या निवेदनावर सह्या आहेत.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# शिक्षणाच्या कक्षा रुंदावण्यासाठी जगभरात एकसमान एकात्मिक शिक्षण पद्धतीचा वापर होणे आवश्यक : राज्यपाल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ज्ञान, माहिती आणि कल्पनांची देवाणघेवाण यामुळे शिक्षणाच्या कक्षा अधिक रुंदावत असतात. येणाऱ्या काळात संपूर्ण जगभरात एकसमान एकात्मिक शिक्षण पध्दतीचा वापर होणे आवश्यक आहे, असे मत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी व्यक्त केले. आधुनिक महाराष्ट्राची जडण-घडण शिल्पकार चरित्रकोशातील आरोग्य कोशाचे प्रकाशन आणि वेस्टर्न ऑस्ट्रेलियातील विद्यापीठासमवेत आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा सामंजस्य करार अशा कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलपती तथा राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या प्रमुख उपस्थितीत सहयाद्री अतिथीगृहात आज सकाळी आयोजित करण्यात आला होता.

यावेळी वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे पहिले आंतरराष्ट्रीय शिक्षणमंत्री डेव्हिड टेम्पलमन, युनिर्व्हसिटी ऑफ नॉट्रे डेम ऑस्ट्रेलियाच्या कुलगुरु प्राध्यापिका सेलमा अलिक्स, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरु निवृत्त लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर, विद्यापीठाचे प्रकुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ, कुलसचिव डॉ. कालिदास चव्हाण यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात बोलताना राज्यपाल म्हणाले की, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया भारतामध्ये असलेली युवा शक्ती यांनी प्रेरित असून भारतातील आणि महाराष्ट्रातील विद्यापीठासमवेत सामंजस्य करार करण्यास उत्सुक आहे ही बाबत आनंदाची आहे. येणाऱ्या काळात एकसमान शिक्षण पध्दत संपूर्ण जगात असणे ही काळाची गरज ठरणार आहे. आज महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाअंतर्गत वेगवेगळया




पॅथींचा समावेश आहे. पण आजच्या विद्यार्थ्यांना या पॅथी शिकताना रुग्णांबरोबर सिंपथी दाखवणे आवश्यक आहे, तरच हे विद्यार्थी आपल्या वेगवेगळया पॅथी चांगल्या समजू शकतील. भारतासह अन्य देशांनी वेगवेगळया क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. आरोग्य, दळवणवळण, पायाभूत सुविधा याबरोबरच शिक्षण क्षेत्रातही प्रगती केली आहे. भारतासह आज सगळेच देश प्रगतीबरोबरच शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. गौतम बुध्द यांचे विचार आणि भगवान महावीर यांनी शांततेची शिकवण भारतासह इतर देशालाही प्रेरित करत आहे. आपल्या आताच्या शिक्षणात सुध्दा शांतता आणि एकात्मता यावर भर असणे आवश्यक आहे. भारताने 21 जून हा आंतरराष्ट्रीय योगा दिवस साजरा करण्याचे निश्चित केल्यानंतर हा दिवस 108 देशांमध्ये साजरा केला जातो हीच आपली एकात्मता आहे असेही राज्यपाल कोश्यारी यावेळी म्हणाले.

वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे आंतरराष्ट्रीय शिक्षणमंत्री डेव्हिड टेम्पलमन यावेळी म्हणाले की, कुशल मनुष्यबळ निर्माण करणाऱ्या भारतासारख्या देशाबरोबर शैक्षणिक सामंजस्य करार करणे ही आमच्यासाठी अत्यंत आनंदाची बाब आहे. येणाऱ्या काळात आपल्यात अनेक शैक्षणिक करार करताना याचा फायदा कसा होईल याकडे अधिक लक्ष देण्यात येईल. शिक्षणक्षेत्रासाठी सगळयात सुरक्षित अशी ओळख असणाऱ्या या राज्यात रोजगार आणि शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. भारतासारख्या देशात पहिला आंतरराष्ट्रीय शिक्षणमंत्री म्हणून आल्यानंतर आपल्याच घरी आल्याचा भास होतो. आमच्या राज्यातून येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांचीही हीच भावना असेल असा विश्वास डेव्हिड टेम्पलमन यांनी व्यक्त केला.

आधुनिक महाराष्ट्राची जडण-घडण शिल्पकार चरित्रकोशातील आरोग्य कोशाचे प्रकाशन आज मान्यवरांच्या हस्ते झाले. या आरोग्य कोशात सुमारे 550 पेक्षा अधिक चरित्रनायकांचा समावेश करण्यात आला असून विद्याशाखानिहाय ते वर्गीकृत करण्यात आले आहेत. प्रकाशित करण्यात येणारा आरोग्यकोश शिक्षक, विद्यार्थी व अभ्यागतांकरीता उपयुक्त असणार आहे. याच कार्यक्रमात आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि युनिव्हर्सिटी ऑफ नॉट्रे डेम ऑस्ट्रेलिया यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

विद्यापीठातील वैद्यकीय इतिहास संग्रहालयाचे नुतनीकरण करण्यात येणार असून केंद्र शासनाच्या वाणिज्य मंत्रालय अंतर्गत कार्य करणारे अहमदाबाद येथील नॅशनल डिझाईन संस्थान समवेत सामंजस्य करार आज करण्यात आला. या करारानुसार कामाचे तीन टप्पे असून पहिल्या टप्प्यात वैद्यकीय इतिहास संग्रहालय पुनर्विकासासाठी आवश्यक मूल्यमापन आणि योजना तयार करण्यात येणार आहेत दुसऱ्या टप्प्यात संग्रहालयाची संकल्पना आणि रचना तसेच अंतीम टप्प्यात संग्रहालयास मूर्त रुप देण्यात येणार आहे. आरोग्य शिक्षण व संशोधनासाठी शिक्षक, विद्यार्थी व अभ्यागतांना माहितीसाठी विद्यापीठ आवारातील संग्रहालय महत्वपूर्ण असणार आहे.



## बाजारसावंगी परिसरातील रस्त्यांची अत्यंत दुरवस्था

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन गवळी**

**बाजारसावंगी :** परिसरातील बाजारसावंगी ते रेल, धामणगाव व झरी बोडखा फाटा ते वडगाव व इंदापूर ते बोडखा या रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली असून रस्त्यावर फक्त पाण्याचे डबके साचलेले आहेत आणि चिखलच चिखल आहे. त्यामुळे नागरीकांना या रस्त्याने कसरत करत वाहने चालवावी लागत आहे. पुर्ण रस्त्याची चाळणी झाली आहे.

गेल्या दहा बारा वर्षांपासून ही परिस्थिती असून या रस्त्याचे काम व्हावे, यासाठी अनेक वेळा वारंवार मागणी होत आली आहे तरी कुणीच याकडे लक्ष द्यायला तयार नाही. बोडखा या मार्गाने जाणारी कन्नड फुलंब्री बससेवा सुद्धा बंद झाली आहे कारण रस्ताच शिल्लक राहिलेला नाही. खड्डेच खड्डे आहेत. त्यामुळे वाहनचालक त्रस्त झाले आहेत आणि आता पावसाळयात तर या रस्त्याने प्रवास म्हणजे शक्यच नाही. त्यामुळे पर्यायी दुसऱ्या रस्त्याने म्हणजे यापेक्षा डबल अंतरावरून दूरवरून नागरीकांना जावे लागते आहे. आता पावसाळयात डांबरीकरण शक्य नाही मात्र खड्ड्यांमध्ये मुरूम, बारीक खडी टाकून तात्पुरते का होईना हे खड्डे बुजून रस्ता व्यवस्थित करण्यात यावा जेणे करून प्रवास तरी करता येईल म्हणजे दुरून जावे लागणार नाही, अशी मागणी ग्रामस्थ प्रवासी, वाहनचालक करत आहेत.

## कामगारांच्या मागण्यांसाठी 'सीटू'चे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** शालेय पोषण आहार कामगारांच्या प्रलंबित मागण्यासंदर्भात आज धुळे व नंदुरबार जिल्हा स्वयंपाकी मदतनीस कामगार संघटना अर्थात सिटू च्या वतीने क्यूमाईन क्लब समोर धरणे आंदोलन करण्यात आले आहे. तसेच या प्रलंबित मागण्या संदर्भात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

धुळे जिल्ह्यातील १ ली ते ८ वी च्या विद्यार्थाना मध्यान भोजन देण्यात येत आहे. शालेय पोषण आहार बनवणाऱ्या कामगारांना १५०० रु. महिना अशाप्रकारे मानधनही अदा करण्यात येत आहे मात्र या तुटपुंजा पगारामध्ये कामगारांना वाढत्या महागाईचा सामना देखील करावा लागत आहे त्यामुळे इतर राज्याप्रमाणे शालेय पोषण आहार कामगारांना १९००० रु. मानधन देण्यात यावे. कामगारांना विनाकारण विना चौकशी कामावरून कमी करू नये. एप्रिल मे महिन्याचा ४३ दिवस मानधन व इंधन भाजीपाला व पुरक आहार बिल तात्काळ देण्यात यावे. सेंट्रल किचन पध्दत बंद करून शासनाने बंद केलेला तेलाचा पुरवठा तात्काळ सुरू करावा. शालेय पोषण आहार कामगारांना शासकीय सेवेत कायम करावे.

तसेच सेवा समाप्तीच्या वेळी सेवापुर्ती म्हणून एक लाख रुपये अनुदान देऊन तीन हजार रुपये पेन्शन व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीला प्राधान्याने सेवेत रुजू करावे अशा मागण्यासाठी आज स्वयंपाकी मदतनीस कामगार संघटनेच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले आहे. तसेच या मागण्यांचे निवेदन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहे.



## गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने देव्हारी ग्रामपंचायतमध्ये वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** सोयगाव तालुक्यातील देव्हारी ग्रामपंचायतमध्ये गुरुपौर्णिमेच्या वृक्षाला गुरु मानणारे देव्हारी गावातली नागरिक आणि ग्रामसेवक सुरेश काळे यांच्या माध्यमातून गावातील देव्हारी ग्रामपंचायत परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. सोयगाव तालुक्यातील देव्हारी ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून गावातील रस्त्यालगत व सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

जंगलतोड व अन्य कारणांमुळे झाडांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याबाबत शासनाकडून प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवून जनजागृती केली जात आहे.

ग्रामसेवक सुरेश काळे यांच्या माध्यमातून देव्हारी गावात नुकताच वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमावेळी देव्हारी ग्रामपंचायतचे सरपंच शामिरखा तडवी, उपसरपंच मीराबाई चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य तेजराव जाधव, रोहिदास राठोड, निलेश चव्हाण, नितीन राठोड, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य, सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला

३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट

गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/-
पाने ५३४
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/-
पाने ५३४
उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/-
पाने ३६४
श्रीमती छायाताई खेडकर
8888780568
श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712
गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड
मो. 8149196415
दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910